सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
विधी व न्याय विभाग

सन १९४७ चा मुंबई अधिनियम, क्रमांक ६२

# मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७

(दिनांक १ नोव्हेंबर २००६ पर्यंत सुधारलेला)

# Bombay Act No. LXII of 1947

## The Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947

*(As Modified upto 1st November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[[ किंमत : रुपये ५.०० ]]

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२

## (मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७)

### अनुक्रमणिका

उद्देशिक,
कलमे — पृष्ठ

प्रकरण एक

प्रारंभिक


| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. . . | ३ |
| २. | व्याख्या. . . | ४ |


प्रकरण दोन

स्थानिक व प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण व तुकड्यांची व्यवस्था लावणे


| | | |
|---|---|---|
| ३. | स्थानिक क्षेत्रांचे निर्धारण. . . | ६ |
| ४. | प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण. . . | ६ |
| ५. | प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण व त्यात सुधारणा करणे. . . | ६ |
| ६. | अधिकार अभिलेखात नोंद करणे. . . | ७ |
| ७. | तुकड्यांचे हस्तांतरण व ते पट्टयाने देणे. . . | ७ |
| ८. | तुकडे पाडण्यास मनाई . . | ७ |
| ८ अअ. | जमिनीच्या विभाजनावर निर्बंध . . | ८ |
| ८ अ. | कलमे ७ व ८ ही सार्वजनिक प्रयोजनाकरिता केलेल्या हस्तांतरणास लागू होणार नाहीत. . . | ९ |
| ९. | अधिनियमाच्या तरतुदींविरुध्द हस्तांतरण किंवा विभाजन केल्याबद्दल शास्ती . . | ९ |
| १०. | तुकड्यांचे शासनाकडे हस्तांतरण. . . | १० |
| ११. | (वगळण्यात आले). . . | |
| १२. | कलम १० च्या प्रयोजनांकरिता भरपाई ठरविणे. . . | १० |
| १३. | सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलमे ११७अ आणि ११७ब यांची सुधारणा. | ११ |
| १४. | न्यायालयामार्फत तुकडा न विकणे किंवा अशा विक्रीमुळे तुकडा निर्माण न करणे. | ११ |


प्रकरण तीन

एकत्रीकरणाची कार्यपध्दती


| | | |
|---|---|---|
| १५. | शासनास स्वतः होऊन किंवा अर्ज करण्यात आल्यास, धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना तयार करण्याचा आपला उद्देश जाहीर करता येईल. | ११ |
| १५ अ. | योजना तयार करणे व ती तयार करताना अनुसरावयाची तत्त्वे. . . | ११ |
| १६. | भरपाई देण्याबाबत योजनेत तरतूद करणे. . . | १२ |
| १७. | धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याच्या योजनेत सार्वजनिक रस्ते, वगैरे समाविष्ट करुन घेणे. . . | १२ |
| १८. | सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवलेली जमीन. . . | १३ |
| १९. | योजनेचा मसुदा व सुधारलेला मसुदा प्रसिध्द करणे. . . | १४ |
| २०. | योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा कायम करणे. . . | १४ |
| २१. | योजनेची अंमलबजावणी. . . | १५ |
| २२. | योजना अंमलात येणे. . . | १६ |
| २३. | धारण जमिनींच्या हस्तांतरणास विवक्षित कायद्यांची मनाई नसणे. . . | १६ |
| २४. | हस्तांतरण प्रमाणपत्र. . . | १६ |
| २५. | एकत्रीकरणास सहाय्य देण्यासाठी कर्जे. . . | १६ |

अनुक्रमणिका–चालू


| कलमे | | पृष्ठ |
|---|---|---|
| | **प्रकरण चार** | |
| | **एकत्रीकरणासंबंधीच्या कामांचा आणि धारण जमिनींच्या एकत्रीकरणाचा परिणाम** | |
| २६. | एकत्रीकरण अधिकाऱ्याने विवक्षित अधिनियमांन्वये अधिकारांचा वापर करणे. . . | १७ |
| २७. | विवक्षित कामे स्थगित करणे; एकत्रीकरणासंबंधीची कामे चालू असताना जमिनीचे हस्तांतरण करण्यास बंदी. . . | १८ |
| २८. | धारण जमिनीबाबत हक्क. . . | १९ |
| २९. | भारांचे हस्तांतरण. . . | १९ |
| २९ अ. | पट्टयांचे हस्तांतरण करावे किंवा नाही याविषयी एकत्रीकरण अधिकाऱ्याने निर्णय देणे. | २० |
| ३०. | विवादाच्या बाबतीत नुकसानभरपाईच्या रकमेचे किंवा निव्वळ किंमतीचे संविभाजन. | २१ |
| ३१. | एकत्रित धारण जमिनीचे अन्यसंक्रामण किंवा त्याची पोट-विभागणी करण्यावर निर्बंध. | १७ |
| ३१ अअ. | दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी करण्यात आलेली विवक्षित हस्तांतरणे, विभाजने व पोटविभागण्या विधिग्राह्य करणे. | २३ |
| ३१ अब. | दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर आणि सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेली विवक्षित हस्तांतरणे किंवा पोटविभागण्या विधिग्राह्य करणे. | २३ |
| ३१ अ. | योजनेतील लेखनदोष व अंकगणितीय चुका सुधारणे. . . | २३ |
| ३२. | चूक, नियमबाह्यता किंवा रीतीबाह्यता घडल्याच्या कारणावरुन योजनेत फेरबदल करण्याचा अधिकार. . . | २४ |
| ३३. | योजनेत फेरबदल करण्याचा किंवा ती परत घेण्याचा अधिकार. . . | २४ |
| ३३ अ. | कायम झालेली योजना परत घेण्याचा राज्य शासनाचा अधिकार. . . | २४ |
| | **प्रकरण चार अ** | |
| | **एकत्रीकरण अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्यपध्दती** | |
| ३३ ब. | प्रवेश करण्याचा हक्क . . | २५ |
| ३३ क. | पुरावा देण्यासाठी आणि दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तीस समन्स काढून बोलावण्याचा अधिकार. . . | २५ |
| ३३ ड. | समन्सचा नमुना आणि ते बजावण्याची पध्दती. . . | २५ |
| ३३ इ. | समन्सचे पालन न करण्याबद्दल दंड. . . | २५ |
| | **प्रकरण पाच** | |
| | **सर्वसाधारण** | |
| ३४. | जमाबंदी आयुक्तांचे अधिकार निहित करणे. . . | २६ |
| ३४ अ. | ग्राम समित्यांची रचना करणे . . | २६ |
| ३५. | कार्यवाहीचे कागदपत्र मागविण्याचा राज्य शासनाचा किंवा आयुक्ताचा अधिकार | २६ |
| ३६. | अपील व पुनरीक्षण. . . | २६ |
| ३६ अ. | अधिकारितेस रोध. | २७ |
| ३६ ब. | या अधिनियमान्वये निर्णय द्यावयाच्या वादप्रश्नांचा अंतर्भाव असलेले दावे. . . | २७ |
| ३६ क. | हानिरक्षण. | २७ |
| ३७. | नियम | २७ |
| ३८. | निरसन व व्यावृत्ती. | ३० |

# सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२[१]

## [मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७] †

[२९ जानेवारी १९४८]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये सुधारणा, अनुकूलन व रुपभेद करण्यात आले आहेत :–

विधि अनुकूलन आदेश, १९५०.

सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३१.

सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९.

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३.

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१.

## धारण शेतजमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्यांचे एकत्रीकरण करण्यासाठी तरतूद करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी**, धारण शेतजमिनीचा अधिक चांगली लागवड करण्याच्या प्रयोजनांसाठी धारण शेतजमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे आणि त्यांचे एकत्रीकरण यासाठी तरतूद करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी**, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास, मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र**, १९४६, भाग पाच, पृष्ठ १३९ (इंग्रजी) पहा; निवड समितीच्या अहवालासाठी सन १९४७ चे उपरोल्लिखित राजपत्र, भाग पाच, पृष्ठ १९५ (इंग्रजी) पहा. विधानसभेतील कामकाजासाठी सन १९४७ चा मुंबई विधानसभा चर्चा, खंड दहा व खंड अकरा पहा; आणि विधानपरिषदेतील कामकाजासाठी सन १९४७ चा मुंबई विधानपरिषद चर्चा, खंड तेरा पहा.

† सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ६१ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी हा अधिनियम मुंबई राज्याच्या ज्या भागास लागू नव्हता त्या भागास तो लागू करण्यात आला आहे. (१९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम २ पहा.)

[१] [ (२) तो संपूर्ण [२] [ महाराष्ट्र राज्यास ] लागू आहे.]

(३) तो, [३] [राज्य] शासन **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा क्षेत्रात व अशा तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.२. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुध्द काही नसल्यास, या अधिनियमात, —

(१) "कृषि वर्ष" म्हणजे, एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस सुरु होणारे वर्ष;

(२) "धारण जमिनींचे एकत्रीकरण" म्हणजे, कोणत्याही गावातील, महालातील किंवा तालुक्यातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील धारण जमिनींच्या तुकड्यांची संख्या कमी करण्यासाठी त्या जमिनींचे किंवा जमिनीच्या भागांचे एकत्रीकरण करणे व आवश्यक तेथे त्यांची फेरवाटणी करणे;

(३) "एकत्रीकरण अधिकारी" म्हणजे, कलम १५ अन्वये [३] [राज्य] शासनाने एकत्रीकरण अधिकारी म्हणून नेमलेला अधिकारी; आणि त्यात या अधिनियमान्वये एकत्रीकरण अधिकाऱ्यांची सर्व किंवा कोणतीही कामे करण्यास [३] [राज्य] शासनाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचा अंतर्भाव होतो;

[४] [ (३अ) "सहकारी संस्था" म्हणजे, [५] [ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०] अन्वये नोंदलेली किंवा नोंदलेली आहे असे समजण्यात येणारी सहकारी संस्था ]; १९६१ चा महाराष्ट्र २४.

[६] * * * * * *

(४) "तुकडा" म्हणजे, या अधिनियमान्वये ठरविलेल्या समुचित प्रमाण क्षेत्रापेक्षा कमी विस्ताराचा भूखंड;

परंतु, कोणताही जमिनीचा भूखंड धुऊन गेल्यामुळे त्यांचे क्षेत्र कोणत्याही प्रमाणात कमी झाले असेल तर या कारणावरुन तो तुकडा आहे असे समजले जाणार नाही;

(५) "जमीन" म्हणजे, शेतजमीन मग तो दुमाला असो अगर बिनदुमाला असो;

(६) "स्थानिक क्षेत्र" म्हणजे, कलम ३ अन्वये **शासकीय राजपत्रात** स्थानिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेले कोणतेही क्षेत्र;

[७] [ (७) * * * * * * ]

---

[१] हे पोट कलम, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

[२] हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य" या शब्दांऐवजी दाखल करण्यात आला.

[३] हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[४] हा खंड, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आला.

[५] हा मजकूर, व आकडे, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (अ) अन्वये "मुंबई सहकारी संस्था अधिनियम, १९२५" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[६] हा मजकूर, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये वगळण्यात आला.

[७] खंड (७) हा, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२) (ब) अन्वये वगळण्यात आला.

(८) बिनदुमाला जमिनीच्या बाबतीत "मालक" म्हणजे वहिवाटदार [1][ किंवा मुधृतिधारक] आणि जेव्हा अशी जमीन गहाण ठेवलेली असेल तेव्हा मालक म्हणजे गहाणकार; दुमाला जमिनीच्या बाबतीत मालक म्हणजे वरिष्ठ धारक ; [2]* * * * :

[3][परंतु] [4][महाराष्ट्र राज्यातील] हैद्राबाद क्षेत्राच्या बाबतीत, "मालक" या संज्ञेचा अर्थ ज्या व्यक्तीस जमिनीवरील कब्जाचा कायम व वंशपरंपरागत अधिकार प्राप्त झालेला असेल ती व्यक्ती असा असेल; आणि जेव्हा बिनदुमाला जमीन गहाण दिलेली असेल तेव्हा "मालक" या संज्ञेचा अर्थ गहाणकार असा होईल;]

[5]* * * *

(९) "विहित" म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या नियमांनी विहित केलेले;

१८७९ चा मुंबई ५. [6][(९अ) "संबध्द संहिता" म्हणजे –

[7][(अ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात, † मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९];

१९५५ चा मध्यप्रदेश २. (ब) [4][महाराष्ट्र राज्याच्या] विदर्भ प्रदेशात, मध्यप्रदेश भू-राज्यस्व संहिता, १९५४; आणि

१३१७ फसलीचा हैदराबाद ८. (क) [4][महाराष्ट्र राज्याच्या] हैदराबाद क्षेत्रात, हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली;

(९ब) "संबध्द कुळवहिवाट कायदा" म्हणजे –

१९४८ चा मुंबई ६७. [7][(अ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई क्षेत्रात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमिनी अधिनियम, १९४८;]

१९५० चा हैदराबाद २१. (ब) [4][महाराष्ट्र राज्याच्या] हैदराबाद क्षेत्रात, हैदराबाद कुळवहिवाट, व शेतजमीन अधिनियम, १९५०;

१९५८ चा मुंबई ९९. [8][(क) महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ प्रदेशात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८;]

[9]* * * * *

---

[1]हा मजकूर सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२) (क) अन्वये दाखल करण्यात आला.

[2]"किंवा गिरासदार" हा मजकूर महाराष्ट्र विधी अनुकूलन ( राज्य व समवर्ती विषय) आदेश,१९६०, अन्वये वगळण्यात आला.

[3]हे परंतुक, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२) (क) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[4]हा मजकूर महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य " या शब्दांऐवजी दाखल करण्यात आला.

[5]स्पष्टीकरण वरील आदेशान्वये वगळण्यात आले.

[6] खंड ९ (अ) ते खंड ९ (क) हे, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३(२) (ड) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[7]उपखंड (अ) हा, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये, मूळ उपखंडाऐवजी दाखल करण्यात आला.

[8]उपखंड (क) हा, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २ (ब) अन्वये, मूळ उपखंडाऐवजी दाखल करण्यात आला.

[9]उपखंड (ड) हा. महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये, वगळण्यात आला.

† महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र ४१) पहा.

(९क) "जमाबंदी आयुक्त" या संज्ञेत, भूमापन व जमाबंदी आयुक्त यांचा अंतर्भाव होतो.]

(१०) जमिनीच्या कोणत्याही वर्गाच्या संबंधात, "प्रमाण क्षेत्र" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ अन्वये [1][राज्य] शासन कोणत्याही विवक्षित स्थानिक क्षेत्रात फायदेशीर लागवड करण्यासाठी आवश्यक असलेले किमान क्षेत्र म्हणून वेळोवेळी ठरवील असे क्षेत्र, असा असेल, व तीत उक्त कलमान्वये सुधारणा केलेल्या प्रमाणे क्षेत्राचा अंतर्भाव होईल;

[2][(१० अ) "ग्राम समिति" म्हणजे, कलम ३४अ, अन्वये रचना केलेली ग्राम समिति;]

(११) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्द प्रयोग यांचा अर्थ [3][संबध्द संहितेत] त्या शब्दांचा व शब्दप्रयोगांचा जो अर्थ दिलेला असेल तोच असेल. ;

[4]* * * * *

## प्रकरण दोन

### स्थानिक व प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण व तुकडयांची व्यवस्था लावणे

स्थानिक क्षेत्रांचे निर्धारण. ३. [1][राज्य] शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारा, एखादे गाव, महाल किंवा तालुका [5][किंवा तहसील] किंवा तिचा कोणताही भाग या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता स्थानिक क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट करता येईल.

प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण. ४. (१) [1][राज्य] शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, व त्याने नेमलेल्या जिल्हा सल्लागार समितीशी [6][किंवा इतर कोणत्याही संस्थेशी] विचारविनिमय केल्यानंतर, कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील जमिनीच्या कोणत्याही वर्गासाठी स्वतंत्र भूखंड म्हणून ज्यात फायदेशीर लागवड करता येईल असे किमान क्षेत्र तात्पुरते ठरविता येईल.

(२) [1][राज्य] शासनाने, शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, आणि विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने, पोट-कलम (१) अन्वये तात्पुरती ठरविलेली किमान क्षेत्रे जाहीर केली पाहिजेत व त्यासंबधीचे आक्षेप मागविले पाहिजेत.

प्रमाण क्षेत्रांचे निर्धारण व त्यात सुधारणा करणे. ५. (१) [1][राज्य] शासनाने,संबंधित गावात, कलम ४, पोट-कलम (२) अन्वये अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत जे कोणतेही आक्षेप आले असतील त्यांचा विचार केल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर, अशा स्थानिक क्षेत्रातील जमिनीच्या प्रत्येक वर्गासाठी प्रमाण क्षेत्र ठरविले पाहिजे.

---

[1]हा शब्द विधी अनूकूलन आदेश, १९५० या अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[2]हा खंड, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२) (इ) अन्वये दाखल करण्यात आला.

[3]हा मजकूर, वरील अधिनियमातील कलम ३(२) (फ) अन्वये, "मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[4]खंड (१२) हा, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये वगळण्यात आला.

[5]हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम ६१, कलम ३(३) अन्वये, दाखल करण्यात आला.

[6]हा मजकूर, वरील अधिनियमातील कलम ३(४) अन्वये दाखल करण्यात आला.

(२) [१][राज्य] शासनास, तसे करणे त्यास इष्ट वाटले तर, पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या प्रमाण क्षेत्रात कोणत्याही वेळी सुधारणा करता येईल. अशी सुधारणा कलम ४ मध्ये व पोट-कलम (१) मध्ये ठरवून दिलेल्या रीतीनं केली पाहिजे.

(३) [१][राज्य] शासनाने, **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे व विहित करण्यात येईल अशा इतर रीतीने, पोट-कलम (१) अन्वये ठरविलेल्या किंवा पोट-कलम (२) अन्वये सुधारणा केलेल्या कोणत्याही प्रमाण क्षेत्राची जाहीर नोटीस दिली पाहिजे.

६. (१) एखाद्या स्थानिक क्षेत्रासाठी कलम ५, पोट-कलम (३) अन्वये प्रमाण क्षेत्राविषयी अधिसूचना प्रसिध्द केल्यानंतर, अशा स्थानिक क्षेत्रांतील सर्व तुकड्यांची त्याप्रमाणे अधिकार अभिलेखात नोंद केली जाईल किंवा अधिकार अभिलेख नसतील तेथे अशी नोंद [१][राज्य] शासन विहित करील अशा ग्राम अभिलेखात करण्यात येईल. अधिकार अभिलेखात नोंद करणे.

१३५८ फ. चा ५८. (२) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या प्रत्येक नोंदीची नोटीस [२][राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात, हैदराबाद जमीन अधिकार अभिलेख विनियम, १३५८ फ. अन्वये संबंधित अधिनियमान्वये] फेरफारांच्या नोंदवहीत नोंद करण्यासाठी नोटीस देण्याची जी रीत विहित करण्यात आली असेल, त्या रीतीने देण्यात येईल.

७. (१) कोणत्याही व्यक्तीने, कलम ६, पोट-कलम (२) अन्वये ज्याच्या संबंधात नोटीस देण्यात आली असेल अशा कोणत्याही तुकड्याचे हस्तांतरण त्याच्या लगतच्या भूमापन क्रमांकाच्या किंवा भूमापन क्रमांकाच्या मान्य केलेल्या पोट विभागाच्या [३][मालकाव्यतिरिक्त] इतर कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित करता कामा नये : तुकड्यांचे हस्तांतरण व ते पट्ट्याने देणे.

[४][परंतु, अशा तुकडा धारण करणाऱ्या व्यक्तीस, तो तुकडा राज्य शासनाकडे किंवा जमीन गहाण घेणाऱ्या बँकेकडे किंवा कोणत्याही इतर सहकारी संस्थकडे, यथास्थिति, राज्य शासनाने किंवा अशा बँकेने किंवा संस्थेने त्यास दिलेल्या कोणत्याही कर्जाबद्दल प्रतिभूती म्हणून गहाण ठेवता येईल किंवा त्याचे हस्तांतरण करता येईल.]

(२) [५][त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा लेखात किंवा करारात] काहीही अंतर्भूत असले तरी, असा कोणताही तुकडा त्याच्या लगतची कोणतीही जमीन कसणाऱ्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस पट्ट्याने देता कामा नये.

८. कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील कोणत्याही जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन हे, तुकडा निर्माण होईल अशा रीतीने करता कामा नये. तुकडे पाडण्यास मनाई.

---

[१] हा शब्द विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (५) अन्वये "मुंबई जमीन महसूल अधिनियम, १८७९ अन्वये" याऐवजी दाखल करण्यात आला.

[३] हा मजकूर, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ३ (१) अन्वये, "तो तुकडा लगतच्या भूमापन क्रमांकात समाविष्ट केला जात नाही तोपर्यंत" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] हे परंतुक, वरील अधिनियमातील कलम ३(२) अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[५] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३(६) अन्वये, "मुंबई कुळवहिवाट अधिनियम, १९३९" याऐवजी दाखल करण्यात आला.

जमिनीच्या विभाजनावर निर्बंध.

[1][८अअ.—(१) हस्तांतरण, हुकूमनामा, उत्तराधिकार यामुळे किंवा अन्यथा जर दोन किंवा अधिक व्यक्तींना, ज्या स्थानिक क्षेत्रात प्रमाण क्षेत्रे ठरविण्यात आली असतील त्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रातील अविभक्त जमिनीत हिस्से मिळण्याचा हक्क असेल आणि उक्त जमिनीचे त्यांच्यात विभाजन करावयाचे असेल तर त्या बाबतीत, असे विभाजन, तुकडा निर्माण होणार नाही अशा रीतीने केले पाहिजे.

(२) असे विभाजन न्यायालयाने किंवा जिल्हाधिकाऱ्याने केल्यास पुढील कार्यपध्दती अनुसरली जाईल :—

(अ) अनेक सहहिस्सेदारांमध्ये विभाजन करताना एखाद्या सहहिस्सेदारास जमिनीतील विशिष्ट हिस्सा मिळण्याचा हक्क आहे आणि त्याला तो हिस्सा, तुकडा निर्माण केल्याशिवाय देणे शक्य नाही, असे आढळून आले तर त्याला त्या हिश्श्याबद्दल पैशाच्या स्वरुपात भरपाई देण्यात आली पाहिजे. भरपाईची रक्कम व्यवहार्य असेल तेथवर, भूमि संपादन अधिनियम, १८९४ मधील कलम २३ च्या १८९४ चा १.

[2]* * * * * *

[3]* * * * * *

तरतुदींनुसार ठरविण्यात आली पाहिजे ;

(ब) विभाजन करताना, पोट-कलम (१) च्या तरतुदींना अनुसरून सर्व हिस्सेदारांच्या हिश्श्यांची तरतूद करण्यास पुरेशी जमीन नाही असे आढळून आले तर सहहिस्सेदारांना, आपणांपैकी कोणत्या विवक्षित सहहिस्सेदारास किंवा सहहिस्सेदारांस जमिनीचा हिस्सा मिळावा आणि कोणास पैशाच्या स्वरूपात भरपाई मिळावी याविषयी आपापसांत ठरविता येईल. अशी एकवाक्यता न झाल्यास, ज्यास जमिनीचा हिस्सा द्यावयाचा व ज्यास पैशाच्या स्वरुपात भरपाई द्यावयाची ते सहहिस्सेदार, विहित केलेल्या रीतीने चिठ्ठ्या टाकून निवडले पाहिजे.

(क) प्रत्येक सहहिस्सेदाराने, भरपाईची रक्कम, त्याला कायदेशीरपणे जमीनीचा जो हिस्सा मिळण्याजोगा असेल त्या हिश्श्यापेक्षा त्यास जास्त मिळालेल्या जमिनीच्या किंमतीच्या प्रमाणात दिली पाहिजे, आणि अशा हिस्सेदाराने त्याला नेमून दिलेल्या हिश्श्याचा ताबा घेण्यापूर्वी भरपाईची प्रमाणशीर रक्कम विहित केलेल्या रीतीने जमा केली पाहिजे. त्याने तसे करण्यात कसूर केल्यास, त्याचा हिस्सा, ज्याला आधी जमीन नेमून दिलेली नाही अशा व खंड (ब) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने निवडलेल्या इतर कोणत्याही सहहिस्सेदारास दिला जाईल. मात्र ज्यांना जमिनीचा हिस्सा मिळालेला नाही अशा सहहिस्सेदारांस तशीच भरपाई देण्यात आली पाहिजे.

---

[1] कलम ८अअ हे, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (७) अन्वये, दाखल करण्यात आले.

[2] "किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ (अनुकूलन व प्रयुक्ती) अध्यादेश, १९४८ अन्वये, मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास लागू केलेल्या त्या कलमाच्या" हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये, वगळण्यात आला.

[3] "किंवा यथास्थिति, हैदराबाद भूमि संपादन अधिनियम, १३०९ फसली याचे कलम १८ याच्या" हा मजकूर, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १९, कलम ३ अन्वये, वगळण्यात आला.

(ड) खंड (क) अन्वये ज्यास जमीन नेमून दिलेली आहे अशा सहहिस्सेदारांपैकी कोणीही भरपाई देऊन हिस्सा घेत नसेल तर, तो हिस्सा लिलाव करुन सर्वात जास्त किमत देणाऱ्यास विकण्यात येईल, आणि खरेदीची किमत, ज्यास जमीन मिळालेली नाही त्या सहहिस्सेदारास त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणात देईल.

(ई) ज्या पद्धतीमुळे तुकडा निर्माण होणार नाही अशी विभाजनाची अन्य कोणतीही पद्धत पक्षकारांना मान्य झाल्यास विभाजन करतांना ती पद्धत अनुसरली पाहिजे.

(३) एखाद्या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करताना विभाजन करण्यात आल्यास जमिनीच्या विभाजनासंबंधी आणि भरपाईच्या रकमेच्या वाटणीच्या संबंधातील सर्व प्रश्नांचा निर्णय, यथास्थिति, हुकूमनाम्याची अंमलबजावणी करणाऱ्या न्यायालयाने, किंवा विभाजन करणाऱ्या जिल्हाधिकाऱ्याने, पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार दिला पाहिजे.]

[१] [८अ. कलमे ७, [२] [ ८ व ८ **अअ** ] यांतील कोणतीही बाब राज्य शासन **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसुचनेद्वारे याबाबत विनिर्दिष्ट करील अशा सार्वजनिक प्रयोजनाकरिता केलेल्या कोणत्याही जमिनीच्या हस्तांतरणास लागू होणार नाही. ] कलमे ७ व ८ ही सार्वजनिक प्रयोजनाकरिता केलेल्या हस्तांतरणास लागू होणार नाहीत.

९. (१) या अधिनियमाच्या तरतुदीविरुद्ध केलेले कोणत्याही जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन रद्दबातल होईल. अधिनियमाच्या तरतूदीविरुद्ध हस्तांतरण किंवा विभाजन केल्याबद्दल शास्ती.

(२) अशा रीतीने हस्तांतरण किंवा विभाजन केलेल्या कोणत्याही जमिनीचा मालक हा, जिल्हाधिकारी [३] [राज्य] शासनाच्या सर्वसाधारण आदेशांच्या अधीनतेने निदेश देईल त्याप्रमाणे २५० रुपयांहून अधिक नसेल इतका दंड भरण्यास पात्र होईल. [४][असा दंड जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करण्यायोग्य असेल.]

[५] [(३) जिल्हाधिकाऱ्यास, पक्षकारांच्या कृत्यामुळे किंवा कायद्याच्या अंमलामुळे ज्या जमिनीचे हस्तांतरण किंवा विभाजन निरर्थक झाले असेल अशी कोणतीही जमीन, अनधिकृतपणे ज्याच्या भोगवट्यात असेल किंवा बेकायदेशीरपणे ज्याच्या कब्जात असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अशा जमिनीतून तडकाफडकी काढून टाकता येईल.]

---

[१] कलम ८अ हे, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ४, अन्वये समाविष्ट करण्यात आले.

[२] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (८), अन्वये " व ८" या मजकुराऐवजी, दाखल करण्यात आला.

[३] हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी, दाखल करण्यात आला.

[४] हा मजकूर, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ५ (१) अन्वये जादा दाखल करण्यात आला.

[५] हे पोट-कलम, वरील अधिनियमाच्या कलम ५, (२) अन्वये जादा दाखल करण्यात आले.

तुकड्याचे [1][शासना-कडे] हस्तांतरण

१०. (१) तुकड्याच्या कोणत्याही मालकास, त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींना जिल्हाधिकारी ठरवील अशी भरपाई [2][ राज्य शासनाने दिल्यावर ] [1][ राज्य शासनाकडे ] अशा तुकड्याचे हस्तांतरण करता येईल, आणि त्यानंतर असा तुकडा सर्व भारांपासून मुक्त होऊन [3][ राज्य शासनाकडे ] पूर्णतः निहित होईल; [4][परंतु असा कोणताही तुकडा प्रथमतः लगतच्या भूमापन क्रमांकाच्या मालकास किंवा भूमापन क्रमांकाच्या मान्यता दिलेल्या पोटविभागाच्या मालकास, जिल्हाधिकाऱ्याने पूर्वोक्त रीतीने ठरविलेली भरपाईची रक्कम प्रदान करून घेण्यासाठी, देऊ केलेला असल्याखेरीज आणि अशा मालकाने, अशा भरपाईची रक्कम देऊन तुकडा खरेदी करण्याचे नाकारलेले असल्याखेरीज राज्य शासनाकडे त्याचे हस्तांतरण करता कामा नये.]

(२) अशी कोणत्याही तुकड्याचा विनियोग मुंबई जमीन महसूल संहिता,१८७९, * कलम ११७ब [5][किंवा मध्यप्रदेश भू-राज्यस्व संहिता, १९५४, * कलम १५८ च्या तरतुदींना अनुसरून करता येईल किंवा त्याचा यथास्थिति, हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली, याच्या तरतुदीअन्वये भोगवट्यात नसलेली जमीन म्हणून विनियोग करता येईल.]

१८७९ चा मुंबई ५. १९५५ चा मध्य प्रदेश अधि. २ १३१७ फसली चा हैदराबाद अधि. ८

११. **[शासनास महसूल देण्याबाबत जिच्यावर आकारणी झाली आहे अशा संपदेचे विभाजन करणे किंवा तिच्यातून हिस्सा वेगळा काढून घेणे.]** हे कलम सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१ मधील कलम ३ (१०) अन्वये वगळण्यात आले.

**कलम १० च्या प्रयोजनाकरिता भरपाई ठरविणे.**

१२. कलम १० च्या प्रयोजनांकरिता भरपाई ठरविताना जिल्हाधिकाऱ्याने, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३ पोटकलम (१) च्या [6]* * * * [7]* * * * * * * तरतूदी विचारात घेतल्या पाहिजेत.

१८९४ चा १.

---

[1] हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "अधिपती " या शब्दाऐवजी, दाखल करण्यात आला.

[2] हे शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "अधिपतीने अशी नुकसान भरपाई दिल्यावर " या शब्दाऐवजी, दाखल करण्यात आले.

[3] हे शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये, " प्रांताच्या बाबतीत अधिपतीकडे " या शब्दाऐवजी, दाखल करण्यात आले.

[4] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (९) (अ) अन्वये, दाखल करण्यात आला.

[5] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (९) (ब) अन्वये, दाखल करण्यात आला.

[6] " किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ (अनुकूलन व प्रयुक्ती) अध्यादेश, १९४८ या अन्वये मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास लागू केलेल्या त्या कलमाच्या पोट-कलम (१) च्या " हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये वगळण्यात आला.

[7] " किंवा यथास्थिति, हैदराबाद भूमि संपादन अधिनियम, १३०९ फसली याचे कलम १८ (शेवटचा परिच्छेद धरून)" हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४ अन्वये, वगळण्यात आला.

* हे अधिनियम व संहिता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये निरसित करण्यात आला सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३३६ पहा.

१८७९ चा मुंबई ५. १३. १[ (१) ] मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* कलमे ११७अ व ११७ब यांत उक्त कलमाच्या सुरुवातीस पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :— सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलमे ११७अ आणि ११७ ब यांची सुधारणा.

१९४७ चा मुंबई ६२. " मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींच्या अधीनतेने ",

१३१७ फसलीचा हैदराबाद अधि. ८फ १९४७ चा मुंबई ६२. १[ (२) ] हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली * यात कलम ७६ मध्ये "तालुकादारास" या शब्दानंतर, आणि कलम ८९ब, पोट-कलम (२) मध्ये, " प्लॉट-क्रमांकांची आकारणी " या शब्दानंतर, " मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींच्या अधीनतेने " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

१९५५ चा मध्यप्रदेश अधि. २ (३) मध्यप्रदेश भू-राज्यस्व संहिता, १९५४* मध्ये, कलम ६७, पोट-कलम (१) च्या, कलम १४०, पोटकलम (१) च्या आणि कलम १५८ च्या प्रारंभी पुढील मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

१९४७ चा मुंबई ६२. " मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ याच्या तरतुदींच्या अधीनतेने " ],

२[ १४. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ६, पोट-कलम (२) अन्वये ज्याच्या संबंधात नोटीस देण्यात आली आहे असा कोणताही तुकडा, कोणत्याही न्यायालयाच्या आदेशानुसार त्याची विक्री करण्यात येईल त्यावेळी, लगतच्या भूमापन क्रमांकाच्या किंवा भूमापन क्रमांकाच्या मान्य केलेल्या पोटविभागाच्या मालकाव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस विकता कामा नये; आणि अशा विक्रीच्या वेळी, कोणतीही जमीन, एखादा तुकडा शिल्लक राहील अशा रीतीने विकता कामा नये. ] न्यायालयामार्फत तुकडा न विकणे किंवा अशा विक्रीमुळे तुकडा निर्माण न करणे

## प्रकरण तीन

## एकत्रीकरणाची कार्यपद्धती

१५. कोणत्याही गावातील, महालातील, ३ [तालुक्यातील किंवा तहसिलातील ] किंवा तिच्या कोणत्याही भागातील जमिनीची अधिक चांगली लागवड करण्याकरिता त्यांचे एकत्रीकरण करण्याच्या उद्देशाने, ४ [राज्य] शासनास, ५ [स्वतः होऊन किंवा त्याबाबत अर्ज करण्यात आल्यास] **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध करून आणि संबंधित एका किंवा अनेक गावांत, विहित केलेल्या रीतीने प्रसिद्धी देऊन, विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा एका किंवा अनेक गावांतील किंवा त्याच्या भागातील धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना तयार करण्याचा आपला उद्देश जाहीर करता येईल, संबंधित गावात अशा रीतीने प्रसिद्धी दिल्यानंतर, ४ [राज्य] शासनास एकत्रीकरण अधिकारी नेमता येईल; आणि अशा अधिकाऱ्याने यथास्थिती अशा एका किंवा अनेक गावांतील किंवा त्याच्या भागातील धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना ६*** ७ [यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने ] तयार करण्याच्या कामास लागले पाहिजे. शासनास, स्वतः होऊन किंवा अर्ज करण्यात आल्यास, धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना तयार करण्याचा आपला उद्देश जाहीर करता येईल.

---

१ सन १९५८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१२) अन्वये, कलम १३ यास पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला व पोट-कलमे (२) आणि (३) ही जादा दाखल करण्यात आली.

२ हे कलम सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ६ अन्वये, मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

३ हे शब्द सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१३) (अ) अन्वये, " किंवा तालुक्यातील " या शब्दांऐवजी दाखल करण्यात आले.

४ हा शब्द, विधि अनुकूल आदेश, १९५० अन्वये, " प्रांतिक " या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

५ हे शब्द सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१ च्या कलम ३ (१३) (ब) अन्वये, दाखल करण्यात आले.

* हे अधिनियम व संहिता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये निरसित करण्यात आली. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३३६ पहा.

६ " विहित केलेल्या रीतीने" हे शब्द, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१३) (क) अन्वये, वगळण्यात आले.

७ हे शब्द वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये, दाखल करण्यात आले.

योजना तयार करणे व ती तयार करतांना अनुसरावयाची तत्वे

[1][१५ अ. (१) एकत्रीकरण अधिकाऱ्याने, संबंधित जमीन मालकास आणि ग्राम समितीस रीतसर नोटीस दऊन, संबंधित गावांपैकी प्रत्येक गावास भेट दिली पाहिजे आणि ग्राम समितीशी विचारविनिमय करून जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना तयार करण्यास घेतली पाहिजे आणि अशा योजनेत, विहित करण्यात येतील अशी विवरणपत्रे, अभिलेख आणि नकाशे यांचा समावेश केला पाहिजे.

(२) योजना तयार करतांना, एकत्रीकरण अधिकाऱ्याने, गावातील जमिनी ज्या गटात एकत्रित केल्या जातील त्या गटांची संख्या, प्रत्येक मालकास नवीन भूखंड नेमून देण्याची रीत, ग्रामसमितीच्या शिफारशी आणि विहित करण्यात येतील अशा इतर बाबी यांच्या संबंधात राज्य शासनाकडून, वेळोवेळी विहित करण्यात येईल ती कार्यपद्धती विचारात घेतली पाहिजे.]

भरपाई देण्याबाबत योजनेत तरतूद करणे.

१६. (१) एकत्रीकरण अधिकाऱ्याने तयार केलेल्या योजनेत, ज्या कोणत्याही मालकास त्याच्या मूळच्या धारण जमिनीच्या किंमतीपेक्षा कमी बाजार किमतीची धारण जमीन देण्यात आली असेल त्या मालकास भरपाई देण्याबाबत तरतूद केलेली असेल. तसेच तीत, ज्या कोणत्याही मालकास त्याच्या मूळच्या धारण जमिनीच्या किंमतीपेक्षा अधिक बाजार किंमतीची धारण जमीन देण्यात आली असेल त्या मालकाकडून भरपाई वसूल करण्याबाबत तरतूद केलेली असेल.

(२). भरपाईची रक्कम, जेथवर व्यवहार्य असेल तेथवर, भूमि संपादन अधिनियम, १८९४, कलम २३, पोट-कलम (१) च्या [2]* * * * * 

१८९४ चा १.

[3]* * * * * * *

तरतूदींना अनुसरून ठरविण्यात येईल.

धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याच्या योजनेत सार्वजनिक रस्ते, वगैरे समाविष्ट करून घेणे.

१७. (१) धारण जमिनीचे एकत्रीकरण करण्याची योजना तयार करताना योजनेतील कोणत्याही धारण जमिनीत कोणताही रस्ता, सडक, गल्ली किंवा वाट सामावून घेणे आवश्यक आहे असे एकत्रीकरण अधिकाऱ्यास दिसून आल्यास त्याने तशा अर्थाची घोषणा केली पाहिजे. व अशा घोषणेत उक्त रस्ता, सडक, गल्ली, वाट यातील किंवा यावरील लोकांचे तसेच सर्व व्यक्तींचे हक्क नष्ट करण्याचे किंवा यथास्थिती, ते हस्तांतरित करून, एकत्रीकरणाच्या अशा योजनेत आखलेल्या नवीन रस्त्याच्या, सडकेच्या, गल्लीच्या, किंवा वाटेच्या, संबंधात देण्याचे योजिले असल्याचे नमूद केले पाहिजे.

---

[1] कलम १५अ हे, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१३) अन्वये, दाखल करण्यात आले.

[2] " किंवा भूमि संपादन अधिनियम, १८९४ (अनुकूलन व प्रयुक्ती) अध्यादेश, १९४८ या अन्वये मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास लागू केलेल्या त्या कलमाच्या " हा मजकूर महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये वगळण्यत आला.

[3] " किंवा यथास्थिति, हैदराबाद भूमि संपादन अधिनियम, १३०९ फसली यांचे कलम १८ (शेवटचा परिच्छेद धरुन)" हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ५ अन्वये, वगळण्यत आला.

(२) पोट-कलम (१) मधील घोषणा ही कलम १५ मध्ये उल्लेख केलेल्या योजनेच्या मसुद्यासह विहित केलेल्या रीतीने संबंधित गावात प्रसिध्द करण्यात येईल.

(३) जनतेतील कोणत्याही व्यक्तीस किंवा जाण्यायेण्याच्या सार्वजनिक अधिकाराबरोबरच उक्त रस्ता, सडक, गल्ली किंवा वाट हिच्यात किंवा हिच्यावर जिचा कोणताही हितसंबंध किंवा अधिकार आहे किंवा अशा योजनेमुळे जिच्या हितसंबंधास किंवा अधिकारास बाध येण्याचा संभव असेल अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, पोटकलम (१) अन्वये घोषणा प्रसिध्द केल्यानंतर तीस दिवसांच्या आत, एकत्रीकरण अधिकाऱ्यास पुढील गोष्टी म्हणजेच अशा योजनेस असलेले तिचे आक्षेप, अशा हितसंबंधाचे किंवा अधिकाराचे स्वरूप व त्यास बाध येण्याचा कसा संभव आहे ते, आणि अशा हितसंबंधाबद्दल किंवा अधिकाराबद्दल भरपाईच्या हक्क मागणीची रक्कम आणि तिचा तपशील, या गोष्टी लेखी कळविता येतील :

परंतु, असा रस्ता, सडक, गल्ली किंवा वाट यावरील जाण्यायेण्याचा सार्वजनिक अधिकार नष्ट झाल्याबद्दल किंवा कमी झाल्याबद्दल भरपाईची कोणतीही मागणी विचारात घेतली जाणार नाही.

(४) एकत्रीकरण अधिकाऱ्याने, योजनेसंबंधी जे कोणतेही आक्षेप घेण्यात आले असतील त्यांचा विचार केल्यानंतर, अशा योजनेत त्यास ज्या कोणत्याही सुधारणा करणे आवश्यक वाटेल त्या करून त्याने ही योजना जमाबंदी आयुक्ताकडे सादर केली पाहिजे; तसेच त्याने, योजनेबाबत आलेले आक्षेप, त्यावरील त्याच्या स्वतःच्या शिफारशी व त्याच्या मते काही भरपाईच्या रकमा द्यावयाच्या असल्यास त्या रकमा व अशा रकमा ज्यांनी व ज्यांना द्यावयाच्या असतील त्या व्यक्ती, याविषयाचे एक विवरणपत्र पाठविले पाहिजे. अशा याजनेसंबंधी व भरपाई द्यावयाची असल्यास अशी रक्कम व ज्या व्यक्तींनी ती द्यावयाची असेल त्या व्यक्ती यासंबंधी जमाबंदी आयुक्ताने दिलेला निर्णय, [१] [राज्य] शासन त्यात जो कोणताही फेरफार करील त्याच्या अधीनतेने, अखेरचा असेल.

[२] [१८. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरीही, एकत्रीकरण अधिकाऱ्याने, ग्रामसमितीशी विचारविनियम करून पुढील गोष्टी करणे कायदेशीर असेल :— सार्वजनिक प्रयोजनासाठी राखून ठेवलेली जमीन.

(अ) कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी मुद्दाम नेमून दिलेली कोणतेही जमीन ही, अशा रीतीने नेमून दिलेली असण्याचे बंद होईल, असा निदेश देणे आणि त्या जमिनीऐवजी दुसरी कोणतीही जमीन नेमून देणे ;

(ब) ज्या क्षेत्रातील जमिनीचे एकत्रीकरण करावयाचे त्या कोणत्याही क्षेत्रात, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी तसेच गावठाणांचा विस्तार करण्यासाठी कोणतीही जमीन राखून ठेवलेली नसेल तर किंवा अशा रीतीने राखून ठेवलेली जमीन अपुरी असेल तर, अशा कामांसाठी इतर जमीन नेमून देणे आणि त्या प्रयोजनासाठी गावाच्या सर्व धारण जमिनीत प्रमाणशीर कपात करणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये गावाच्या सर्व धारण जमिनीत प्रमाणशीर कपात करण्यात आली असेल त्या बाबतीत, राज्य शासनाने, तीमुळे नुकसान पोहचलेल्या प्रत्येक व्यक्तीस, अशा कपातीमध्ये समाविष्ट असलेल्या जमिनीच्या संबंधात, कलम १५ अन्वये अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेस असलेल्या जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे भरपाई दिली पाहिजे.

१८९४ चा १. (३) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे असेल त्या व्यतिरिक्त अशा भरपाईची रक्कम एकत्रीकरण अधिकाऱ्याने, व्यवहार्य असेल तितपत, भूमी संपादन अधिनियम, १८९४ याचे कलम २३, पोट-कलम (१) च्या तरतुदींनुसार ठरविली पाहिजे.]

---

[१] हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] कलम १८ हे, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१५) अन्वये मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

योजनेचा मसुदा व सुधारलेला मसुदा प्रसिध्द करणे.

[1] [१९. (१) एकत्रीकरणाची योजना प्रसिध्दीसाठी तयार होईल तेव्हा एकत्रीकरण अधिकाऱ्याने, तिचा मसुदा संबंधित एका किंवा अनेक गावांमध्ये विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द केला पाहिजे. या योजनेमुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, योजनेच्या मसुद्यासंबंधी कोणतेही आक्षेप असल्यास ते अशा प्रसिध्दीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत एकत्रीकरण अधिकाऱ्याकडे लेखी कळविता येतील.

(२) कोणतेही आक्षेप आले असल्यास, त्यांवर विचार केल्यानंतर, एकत्रीकरण अधिकाऱ्यास योजनेच्या मसुद्यात सुधारणा करणे आवश्यक वाटत असेल तर, त्याने योजनेच्या मसुद्यात सुधारणा केली पाहिजे. व पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे त्याने सुधारलेला मसुदा प्रसिध्द केला पाहिजे. अशा सुधारलेल्या मसुद्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा प्रसिध्दीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, योजनेच्या सुधारलेल्या मसुद्यासंबंधी कोणतेही आक्षेप असल्यास ते एकत्रिकरण अधिकाऱ्यास लेखी कळविता येतील.

(३) (अ) पोटकलम (१) अन्वये प्रसिध्द केलेल्या योजनेच्या मसुद्याबाबत किंवा पोटकलम (२) अन्वये प्रसिध्द केलेल्या सुधारित योजनेच्या मसुद्याबाबत कोणतेही आक्षेप घेण्यात आले नाहीत तर असा योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा,

(ब) योजनेच्या मसुद्याबाबत किंवा सुधारलेल्या मसुद्याबाबत आक्षेप घेण्यात आले असतील परंतु एकत्रीकरण अधिकाऱ्यास, सदरहू योजनेच्या मसुद्यात किंवा योजनेच्या सुधारलेल्या मसुद्यात सुधारणा करणे आवश्यक वाटत नसेल तर असे आक्षेप व त्यांवरील त्यांचा अभिप्राय यांसह असा योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा,

(क) उक्त योजनेच्या सुधारलेल्या मसुद्यावर आक्षेप घेण्यात आले असल्यास त्यावर विचार केल्यानंतर, एकत्रीकरण अधिकाऱ्यास योजनेच्या सुधारलेल्या मसुद्यात आणखी सुधारणा करणे आवश्यक वाटले तर असे आक्षेप व त्यांवरील त्यांचा अभिप्राय यांसह, अधिकतर सुधारण्यात आलेला अशा योजनेचा दुरुस्त मसुदा,

कायम करण्यासाठी एकत्रीकरण अधिकाऱ्याने, जमाबंदी आयुक्ताकडे पाठविला पाहिजे.

योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा कायम करणे.

२०. (१) कलम १९, पोटकलम (३) अन्वये योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा मिळाल्यानंतर जमाबंदी आयुक्ताने, कोणतेही आक्षेप असल्यास, त्यांचा व एकत्रीकरण अधिकाऱ्याच्या त्यावरील अभिप्रायाचा विचार केल्यानंतर, एकत्रीकरण अधिकाऱ्याने अनुसरलेल्या कार्यपध्दतीतील बिनचुकपणा व धारण जमिनीचे वाटप व भरपाई यांबद्दल किंवा अभावितपणे चूक किंवा वगळणूक झाल्याने कोणताही लेखनदोष किंवा हिशेबातील चूक निर्माण झालेली नाही याबद्दल अन्यथा खात्री झाल्यानंतर, यथास्थिती, योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा मान्य केला असेल तर तो, कायम केला पाहिजे.

(२) जर एकत्रीकरण अधिकाऱ्याने पाठविलेला योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा जमाबंदी आयुक्तास मान्य नसेल व त्यात सुधारणा करणे आवश्यक आहे असे त्यास वाटत असेल तर त्याने त्यात आणखी सुधारणा केली पाहिजे व संबंधित गावात किंवा गावांमध्ये तो विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द केला पाहिजे. अशा रीतीने प्रसिध्द केलेल्या कोणत्याही योजनेच्या मसुद्यामुळे बाधित होण्याचा संभव असणाऱ्या व्यक्तीस, अशा प्रसिध्दीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्याचे आक्षेप जमाबंदी आयुक्ताकडे लेखी कळविता येतील.

---

[1] कलमे १९, २० आणि २१ ही. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये मूळ कलमांऐवजी दाखल करण्यात आली.

(३) पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत आक्षेप आले नाहीत तर, जमाबंदी आयुक्ताने त्या पोटकलमान्वये प्रसिध्द केल्याप्रमाणे योजनेचा मसुदा कायम केला पाहिजे. उक्त मुदतीत कोणतेही आक्षेप आल्यास जमाबंदी आयुक्ताने, आक्षेपांवर विचार केल्यानंतर त्यास आवश्यक वाटतील अशा फेरफारांनिशी किंवा फेरफारांशिवाय पोटकलम (२) अन्वये प्रसिध्द केलेला योजनेचा मसुदा कायम केला पाहिजे.

२१. (१) कलम २० अन्वये कोणतीही योजना कायम केल्यावर, योजना कायम करण्यात आली असल्याचे नमूद करणारी अधिसूचना जमाबंदी आयुक्ताने **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केली पाहिजे आणि अशी कायम केलेली योजना संबंधित गावात किंवा गावांमध्ये विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द केली पाहिजे. योजनेची अंमल-बजावणी.

(२) पोटकलम (१) अन्वये ज्या तारखेस **शासकीय राजपत्रात** अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली असेल त्या तारखेपासून एक वर्षाच्या मुदतीत, या योजनेअन्वये ज्यांच्याकडून भरपाई वसूल करावयाची आहे अशा जमीन मालकांनी, विहित केलेल्या रीतीने, भरपाईच्या रकमेचा भरणा केला पाहिजे.

(३) पोटकलम (१) अन्वये **शासकीय राजपत्रात** ज्या तारखेस अधिसूचना प्रसिध्द केली असेल त्या तारखेनंतर येणाऱ्या कृषि वर्षाच्या प्रारंभापासून व विहित केलेल्या रीतीने, एकत्रीकरण अधिकाऱ्याने, मालकांना या योजनेअन्वये ज्या धारण जमिनी मिळण्याचा हक्क आहे अशा धारण जमिनी त्यांच्या कब्जात दिल्या पाहिजेत आणि तसे करताना त्यास, या योजनेअन्वये जमिनीचा भोगवटा करण्याचा ज्यास हक्क नसेल अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही जमिनीतून विहित केलेल्या रीतीने काढून टाकता येईल.

परंतु, जे जमीन मालक योजनेमुळे बाधित झाले असतील अशा मालकांपैकी दोन-तृतीयांश किंवा त्याहून अधिक मालक, या योजनेअन्वये ज्या धारण जमिनी मिळण्याचा त्यांना हक्क असेल अशा धारण जमिनींचा कब्जा घेण्यास सहमत झाले तर, एकत्रीकरण अधिकाऱ्यास, अशा मालकांकडून ठरविण्यात येईल अशा अगोदरच्या तारखेपासून अशा धारण जमिनी त्यांच्या कब्जात देता येतील.

(४) जर, कोणत्याही धारण जमिनीच्या मालकाने या योजनेअन्वये द्यावयाची भरपाईची रक्कम ठरविण्याच्या वेळी विचारात न घेतलेली कोणतीही उभी पिके, झाडे, बंधारे किंवा तत्सम इतर सुधारणा यांचा मालकाकडे अशा धारण जमिनीचा कब्जा देताना, तीत समावेश केला असल्याचे आढळून आल्याबद्दल किंवा कोणत्याही धारण जमिनीच्या मालकाने देणे असलेली भरपाईची रक्कम ठरविण्याच्या वेळी विचारात घेतलेली अशी कोणतीही उभी पिके, झाडे, बंधारे किंवा तत्सम इतर सुधारणा या, अशा धारण जमिनीचा कब्जा मालकाकडे देताना अस्तित्वात नसल्याबद्दल किंवा त्याचे बरेच नुकसान झाले असल्याबद्दल एकत्रीकरण अधिकाऱ्याची खात्री झाली तर एकत्रीकरण अधिकाऱ्याने, धारण जमिनीच्या मालकाने देणे असलेली जादा भरपाईची रक्कम किंवा यथास्थिती, अशा धारण जमिनीच्या मूळच्या मालकास द्यावयाच्या भरपाईत करावयाची कपात विहित केलेल्या रीतीने, आदेशाद्वारे निश्चित केली पाहिजे. जेव्हा जादा भरपाई द्यावयाची असेल तेव्हा ज्याच्याकडून ती वसूल करावयाची असेल अशा मालकाने, एकत्रीकरण अधिकाऱ्याने जादा भरपाई ठरविण्यासाठी काढलेल्या आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, ती विहित केलेल्या रीतीने भरली पाहिजे.

(५) ज्याच्याकडून भरपाई वसूल करावयाची आहे अशा मालकाने, पोटकलम (२) किंवा पोटकलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत किंवा एकत्रीकरण अधिकाऱ्याकडून वाढविण्यात येईल अशा, एक वर्षाहून अधिक नसेल अशा आणखी मुदतीत, ती भरपाई भरण्यात कसूर केल्यास, त्याच्याकडून ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(६) जर एखाद्या मालकाने, या योजनेअन्वये जी धारण जमीन मिळण्याचा त्यास हक्क आहे, अशा धारण जमिनीचा कब्जा घेण्याचे नाकारले तर, एकत्रीकरण अधिकाऱ्यास, विहित केलेल्या रीतीने अशा धारण जमिनीतील त्याचे हक्क, अशा धारण जमिनीची किंमत जी व्यक्ती देईल त्या कोणत्याही व्यक्तीच्या नावे करुन देता येतील आणि अशा बाबतीत खर्च वजा करुन मिळालेली किंमत (जिचा यापुढे "निव्वळ किंमत" असा उल्लेख केला आहे) ही, मालकास किंवा धारण जमिनीत हितसंबंध असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल.

(७) जर, धारण जमिनीची किंमत देण्यास कोणतीही व्यक्ती तयार नसेल तर, राज्य शासनास, या योजनेअन्वये मालकाकडून वसूल करण्यायोग्य असेल अशी भरपाई, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करता येईल किंवा राज्य शासनास, मालकास आणि धारण जमिनीत हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, धारण जमिनीची निव्वळ किंमत देऊन ती स्वतः विकत घेता येईल. ]

योजना अंमलात येणे.

२२. या अधिनियमान्वये धारण जमिनीचा कब्जा मिळण्याचा ज्यांना हक्क प्राप्त झाला असेल अशा व्यक्तींनी, त्यांना दिलेल्या आपापल्या धारण जमिनींचा कब्जा घेतल्यावरोबर ही योजना अंमलात आली आहे असे समजण्यात येईल.

धारण जमिनींच्या हस्तांतरणास विवक्षित कायद्यांची मनाई नसणे.

२३. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी मालकांचे किंवा इतर हितसंबंधित व्यक्तींचे हक्क हे, त्या हक्कांना परिणामक ठरणारी कोणतीही एकत्रीकरण योजना अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, अदलाबदल करुन किंवा अन्य प्रकारे हस्तांतरित करण्याजोगे असतील.

हस्तांतरण प्रमाणपत्र.

२४. (१) एकत्रीकरण अधिकाऱ्याने, एकत्रीकरण योजनेअनुसार ज्यास धारण जमीन देण्यात आली आहे अशा प्रत्येक मालकास आणि कलम २१, [1] [ पोटकलम (६) ] अन्वये जिला हक्क देण्यात आला आहे अशा प्रत्येक व्यक्तीस, योजनेअनुसार धारण जमिनींचे हस्तांतरण तिच्याकडे करण्यात आले आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यामध्ये दिले पाहिजे व असे प्रमाणपत्र, भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये योग्य रीतीने नोंदलेले असले पाहिजे. (१९०८ चा १६.)

[2] [ त्यानंतर एकत्रीकरण अधिकाऱ्यास, अशा रीतीने हस्तांतरित केलेल्या धारण जमिनींच्या बाबतीत नवीन अधिकार अभिलेख तयार करुन घेता येतील आणि असे तयार केलेले अधिकार अभिलेख हे राज्याच्या हैद्राबाद क्षेत्रात, हैद्राबाद जमीन अधिकार अभिलेख विनियम, १३५८ फसली अनुसार आणि अन्यत्र संबंधित संहितेअनुसार तयार करण्यात आल्याचे समजण्यात येईल. ] (१३५८ फसलीचा हैद्राबाद अधि. ५८.)

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा प्रमाणपत्राच्या बाबतीत कोणतेही मुद्रांक शुल्क किंवा नोंदणी फी द्यावी लागणार नाही.

एकत्रीकरणास सहाय्य देण्यासाठी कर्जे.

२५. या अधिनियमाचे कोणतेही प्रयोजन पार पाडण्यासाठी मालकास कर्ज देता येईल आणि ते त्याच्याकडून जमीन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३ किंवा शेतकऱ्यांना कर्जे देण्याबाबत अधिनियम, १८८४ अन्वये दिलेल्या कर्जाप्रमाणे वसूल करता येईल. (१८८३ चा १९. १८८४ चा १२.)

---

[1] "पोटकलम" (४) या ऐवजी "पोटकलम" (६) हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ७ अन्वये, दाखल करण्यात आला.

[2] हा मजकूर, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१६) अन्वये, जादा दाखल करण्यात आला.

## प्रकरण चार

### एकत्रीकरणासंबंधीच्या कामांचा आणि धारण जमिनींच्या एकत्रीकरणाचा परिणाम

१८७९ चा मुंबई ५ १९५५ चा मध्यप्रदेश अधि. २ १३१७ फसली चा हैदराबाद अधि. ८ १९०६ चा मुंबई २.

एकत्रीकरण अधिकाऱ्याने विवक्षित अधिनियमान्वये अधिकाराचा वापर करणे.

२६. (१) एकत्रीकरणासंबंधीची कामे चालू असतांना, एकत्रीकरण अधिकाऱ्याने, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* मधील प्रकरण ९, [1] [किंवा मध्यप्रदेश भू राजस्व संहिता, १९५४ * मधील प्रकरण १० किंवा यथास्थिति हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली* मधील प्रकरण ८ अन्वये किंवा] मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६, आणि [2] [संबध्द कुळवहिवाट कायदा] या अन्वये असलेली महसूल अधिकाऱ्यांची कामे चालविली पाहिजेत व पार पाडली पाहिजेत आणि [3] [ज्या कोणत्याही धारण जमिनीच्या किंवा जमिनींच्या संबंधात कलम १५ अ खाली नोटीस देण्यात आली आहे] त्यांच्या संबंधात, एकत्रीकरण अधिकाऱ्याव्यतिरिक्त इतर कोणत्याही महसूल अधिकाऱ्याने उक्त अधिनियमान्वये कोणतेही काम चालविता कामा नये.

(२) जेव्हा एकत्रीकरण अधिकारी कोणत्याही धारण जमिनीच्या संबंधात, कलम १५ अन्वये योजना तयार करण्याच्या कामास लागेल तेव्हा :—

१८७९ चा मुंबई ५. १९५५ चा मध्यप्रदेश अधि. २ १३१७ फसली चा हैदराबाद अधि. ८ १९०६ चा मुंबई २.

(अ) [3] [ज्या कोणत्याही जमिनीच्या किंवा धारण जमिनीच्या संबंधात कलम १५ अ खाली नोटीस देण्यात आली आहे ] त्यांच्या संबंधात, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* मधील प्रकरण ९ [1] [किंवा मध्य प्रदेश भू राजस्व संहिता, १९५४* मधील प्रकरण १० किंवा यथास्थिति हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली * मधील प्रकरण ८ अन्वये किंवा ] मामलतदार न्यायालय अधिनियम, १९०६, आणि [2] [संबध्द कुळवहिवाट कायदा] या अन्वये कोणत्याही महसूल अधिकाऱ्याकडे प्रलंबित असलेले सर्व अर्ज व कामे-अंमलबजावणीची कार्यवाही धरुन-ही एकत्रीकरण अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करण्यात येतील; आणि

(ब) [3] [ज्या कोणत्याही धारण जमिनींच्या संबंधात कलम १५अ खाली नोटीस देण्यात आली असेल अशा धारण जमिनींचा] उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये कब्जा मिळण्याचा हक्क असल्याविषयी ज्या दावा सांगत असतील अशा सर्व व्यक्तींना एकत्रीकरण अधिकाऱ्याने उद्‌घोषणद्वारा, अशा धारण जमिनीचा कब्जा आपणास मिळावा म्हणून विहित केलेल्या मुदतीत अर्ज करण्यास फर्मावले पाहिजे; आणि जी कोणतीही व्यक्ती विहित केलेल्या मुदतीत अशा रीतीने अर्ज करण्यात कसूर करील त्या व्यक्तीस त्यानंतर तसा अर्ज करण्यास मनाई असेल :

परंतु, या खंडातील कोणत्याही तरतुदीमुळे कोणत्याही व्यक्तीस, कलम २२ अन्वये एकत्रीकरणाची योजना अंमलात आल्यानंतर, अशा योजनेत समाविष्ट केलेल्या कोणत्याही धारण जमिनीच्या संबंधात कोणताही अर्ज करण्यास, जर असा अर्ज त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये दाखल करता येत असेल तर, मनाई होणार नाही;

---

[1] हा मजकूर सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१७) अन्वये दाखल करण्यात आला.

[2] "मुंबई कुळवहिवाट अधिनियम, १९३९" या ऐवजी हा मजकूर वरील अधिनियमान्वये दाखल करण्यात आला.

[3] "कलम १५ अन्वये ज्या कोणत्याही जमिनीच्या एकत्रीकरणासाठी अधिसूचना काढण्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ८ अन्वये, दाखल करण्यात आला.

* हे अधिनियम आणि संहिता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये निरसित करण्यात आले. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३३६ पहा.

(३) एकत्रीकरण अधिकाऱ्याने, त्याने उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या बाबतीत जर या कलमान्वये चालविलेल्या कामात पक्षकार असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्या आदेशाच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अर्ज केला असेल तर, तो आदेश कायम करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यास सादर केला पाहिजे.

[1] [विवक्षित कामे] स्थगित करणे; एकत्रीकरण-संबंधीची कामे चालू असताना जमिनीचे हस्तांतरण करण्यास बंदी.

२७. जेव्हा एकत्रीकरण अधिकारी कलम १५ अन्वये योजना तयार करण्याच्या कामास लागेल तेव्हा एकत्रीकरणासंबंधीची कामे चालू असताना-

[2] [(अ) ज्या जमिनीच्या [3] [संबंधात कलम १५ अ खाली नोटीस देण्यात आलेली असेल] अशा कोणत्याही जमिनीच्या बाबतीत,

(एक) मुंबई जमीन महसूल संहिता १८७९* कलम १५३ किंवा १५५ अन्वये चालू असलेली कोणतीही कार्यवाही;

[4] [एक अ]* हैदराबाद जमीन महसूल अधिनियम, १३१७ फसली *, यातील कलम १२० किंवा कलम १२४ अन्वये चालू असलेली कोणतीही कार्यवाही;

(एक ब) मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता १९५४* यातील कलम १३५ अन्वये चालू असलेली कोणतीही कार्यवाही; ]

[5] [(दोन) [6] [महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०] अन्वये दिलेल्या किंवा दिल्याचे मानण्यात आलेल्या कोणत्याही निवाड्याच्या अंमलबजावणीसाठी चालू असलेली कोणतीही कार्यवाही; ]

(तीन) मुंबई कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९४७ [7] [किंवा हैदराबाद कर्जदार शेतकरी सहाय्य अधिनियम, १९५६] [8] * * * अन्वये दिलेल्या कोणत्याही निवाड्याच्या अंमलबजावणीसाठी चालू असलेली कोणतीही कार्यवाही, अथवा

[9] [(तीन अ) मध्यप्रांत व वऱ्हाड कर्ज समेट अधिनियम, १९३३ अन्वये नोंदणी केलेल्या करारानुसार येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी चालू असलेली कोणतीही कार्यवाही; ]

(चार) दिवाणी न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी चालू असलेली कोणतीही कार्यवाही;

१८७९ चा मुंबई ५. १३१७ फ. चा हैदराबाद अधि. ८ १९५५ चा मध्यप्रदेश अधि. २. १९६१ चा महाराष्ट्र २४. १९४७ चा मुंबई २८. १९५६ चा हैदराबाद अधि. १६. १९३३ चा मध्यप्रांत अधि. २.

---

[1] "सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ मधील कलम १५३ आणि १५५ खाली चालू असलेली कामे" या ऐवजी हे शब्द सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ८(२) अन्वये, दाखल करण्यात आले.

[2] मूळ खंडाऐवजी हा खंड वरील अधिनियमाच्या कलम ८(१) अन्वये, दाखल करण्यात आला.

[3] मूळ मजकुराऐवजी हा मजकूर, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ९(ब) अन्वये दाखल करण्यात आला.

[4] खंड १ अ आणि खंड १ ब हे सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३(१८) अन्वये दाखल करण्यात आले.

[5] महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य आणि समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये, उपखंड (२) हा दाखल करण्यात आला.

[6] "मुंबई सहकारी संस्था अधिनियम १९२५" या मजकुराऐवजी हे शब्द आणि संख्या सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ९ अ अन्वये दाखल करण्यात आले.

[7] हा मजकूर सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३(१८) अन्वये, दाखल करण्यात आला.

[8] "किंवा सौराष्ट्र कृषिक ऋणकोस सहाय्य देण्याबाबत अधिनियम, १९५४ याअन्वये" हे शब्द महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य आणि समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये वगळण्यात आले.

[9] खंड (तीन अ) हा सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (१८) अन्वये, दाखल करण्यात आला.

* हे अधिनियम आणि संहिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ अन्वये निरसित करण्यात आले. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३३६ पहा.

[1] [(पाच) कोणत्याही रीतीने विभाजन किंवा पोटविभागणी करण्यासाठी चालू असलेली कोणतीही कार्यवाही.]

सुरु करता येणार नाही; आणि अशी कार्यवाही सुरु करण्यात आली असल्यास ती सर्व स्थगित केली पाहिजे.]

[2] [(ब) एकत्रीकरण अधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीने केले असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने ज्या कोणत्याही जमिनीच्या संबंधात कलम १५अ अन्वये नोटीस देण्यात आली असेल अशी जमीन हस्तांतरित करता कामा नये. अशी परवानगीही, विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत व अशा शर्तीच्या अधीनतेने देता येईल.]

२८. एकत्रीकरणाच्या योजनेनुसार ज्यास धारण जमीन देण्यात आली आहे अशा प्रत्येक मालकास [3] [कलम २९अ मध्ये अन्यथा जी तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त] त्याच्या मूळ धारण जमिनीबाबत त्यास जे हक्क होते तेच हक्क अशा धारण जमिनीबाबत असतील : धारण जमिनीं-बाबत हक्क.

परंतु, कलम २१, [4] [पोट-कलम (६) च्या] तरतुदी अन्वये ज्यास धारण जमीन देण्यात आली आहे अशा कोणत्याही व्यक्तीस या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

२९. (१) कलम २२ अन्वये अंमलात आलेल्या एकत्रीकरणाच्या योजनेत समाविष्ट केलेल्या, एखाद्या मालकाच्या धारण जमिनीवर [5] [पट्टयाव्यतिरिक्त] [6] * * गहाणाचा, ऋणाचा किंवा इतर भाग असेल तर [6] * * असे गहाण, ऋण व इतर भार त्या जमिनीपासून हस्तांतरित होऊन, योजनेनुसार त्यास देण्यात आलेल्या धारण जमिनीकडे किंवा एकत्रीकरण अधिकारी कलम ३७ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने अशा जमिनीचा जो भाग नेमून देईल. त्या भागाकडे हस्तांतरित होईल व त्याच्याशी संलग्न होईल; आणि यथास्थिती, [7] * * गहाणदार, धनको किंवा इतर भारधारक यांनी त्याप्रमाणे त्यावरील आपले हक्क चालविले पाहिजेत. भारांचे हस्तांतरण.

(२) पोट-कलम (१) अन्वये [6] * * गहाण, कर्ज किंवा इतर भाग जिच्याकडे हस्तांतरित झाला असेल तर ती धारण जमीन, जिच्यापासून असे हस्तांतरण झाले असेल त्या मूळ धारण जमिनीच्या बाजार किंमतीपेक्षा कमी किंमतीची असेल तर यथास्थिती, [7] * * गहाणदार, धनको किंवा इतर भारधारक यास, कलम ३० च्या तरतुदींच्या अधीनतेने, त्या प्रकरणी आवश्यक असेल त्याप्रमाणे एकत्रीकरण अधिकारी ठरवील अशी भरपाई, धारण जमिनीच्या मालकाकडून मिळण्याचा हक्क असेल.

---

[1] खंड ५ हा सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्र. ६१, कलम ३(१८) अन्वये, दाखल करण्यात आला.

[2] खंड (ब), सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३१, कलम २ अन्वये, दाखल करण्यात आला.

[3] हे शब्द व संख्या, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्र. ६९, कलम ९ अन्वये, दाखल करण्यात आले.

[4] "पोट-कलम (४)" याऐवजी हे शब्द, कंस व संख्या, सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १० अन्वये, दाखल करण्यात आले.

[5] हे शब्द सन १९५३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६९, कलम १०(२) अन्वये, समाविष्ट करण्यात आले.

[6] "पट्टा" हा शब्द, वरील अधिनियमाच्या कलम १० (१) अन्वये वगळण्यात आला.

[7] "पट्ट्याने घेणारा" हा शब्द वरील अधिनियमाच्या कलम १० (१) अन्वये, वगळण्यात आला.

(३) कलम २१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एकत्रीकरण अधिकाऱ्याने, कब्जा मिळण्याचा ज्यास हक्क असेल असा कोणताही [१] * * गहाणदार किंवा इतर भारधारक यास, पोट-कलम (१) अन्वये त्याचा [२] * * गहाण किंवा इतर भार जिच्याकडे हस्तांतरित झाला असेल अशा जमिनीचा कब्जा विहित केलेल्या रीतीने दिला पाहिजे.

पट्ट्याचे हस्तांतरण करावे किंवा नाही या विषयी एकत्रीकरण अधिकाऱ्याने निर्णय देणे.

[३] [२९ अ.- (१) कलम २२ अन्वये अंमलात आलेल्या एकत्रीकरणाच्या योजनेत समाविष्ट केलेल्या एखाद्या मालकाच्या धारण जमिनीवर पट्ट्याचा भार असेल तर, एकत्रीकरण अधिकाऱ्याने असा भार तिच्यापासून हस्तांतरित करावा किंवा नाही याविषयी लेखी आदेशाद्वारे निर्णय दिला पाहिजे. या पोट-कलमान्वये एकत्रीकरण अधिकाऱ्याने दिलेल्या आदेशाची एक प्रत धारण जमिनीजवळील जागेवर लावली जाईल. तसेच असा आदेश विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द केला जाईल.

(२) जर एकत्रीकरण अधिकाऱ्याने असा पट्ट्याचा भार मूळ धारण जमिनीपासून हस्तांतरित करण्यात यावा असा निर्णय दिला तर, तो भार योजने अन्वये मालकास दिलेल्या धारण जमिनीशी किंवा एकत्रीकरण अधिकाऱ्याने कलम ३७ अन्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने जो भाग नेमून दिलेला असेल त्या भागाशी संलग्न होईल, आणि पट्टेदार त्याप्रमाणे त्यावरील आपले हक्क चालवील. कलम २९, पोटकलम (२) व (३) यांच्या तरतुदी, जणू असा पट्टा हा गहाण किंवा इतर भार आहे असे समजून त्यास लागू होतील.

(३) असा पट्टा मूळ धारण जमिनीपासून हस्तांतरित करण्यात येऊ नये असा निर्णय एकत्रीकरण अधिकाऱ्याने दिल्यास, तो तिच्याशी तसाच संलग्न राहील; आणि योजनेअन्वये ज्यास अशी धारण जमीन देण्यात आली आहे, असा मालक ती धारण जमीन अशा, पट्ट्याच्या भारानिशी धारण करील; आणि मालकीत कोणताही बदल झाला असला तरी [४] [संबध्द कुळवहिवाट कायद्याच्या] तरतुदी या, शक्य तेथवर, अशा पट्ट्याच्या बाबतीत लागू होतील; आणि [५] [उक्त कायद्याच्या] तरतुदी या, जमीनमालक आणि त्याचे कूळ यांच्या दरम्यानच्या हक्कांना व दायित्वांना जशा लागू आहेत तशाच त्या अशा मालकाच्या व पट्टेदाराच्या हक्कांना व दायित्वांना लागू असतील :

परंतु, अशा मालकांना, वर सांगितल्याप्रमाणे धारण जमीन दिल्याच्या निकटपूर्वी अशा पट्ट्यानुसार येणे असलेल्या खंडाच्या थकबाकीची रककम मिळण्याचा हक्क असणार नाही.

(४) या कलमान्वये एकत्रीकरण अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाविरुध्द, जमाबंदी आयुक्ताकडे विहित केलेल्या मुदतीत अपील करता येईल.]

---

[१] "पट्ट्याने घेणारा" हा शब्द सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम १०(१) अन्वये, वगळण्यात आला.

[२] "पट्टा" हा शब्द सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम १०(१) अन्वये वगळण्यात आला.

[३] कलम २९ अ, वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये, दाखल करण्यात आले.

[४] "मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८" या मजकुराऐवजी हा मजकूर सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३(१९) अन्वये, दाखल करण्यात आला.

[५] "उक्त अधिनियमाच्या" या शब्दाऐवजी हे शब्द, सन १९५८ च्या वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये दाखल करण्यात आले.

३०. (अ) कलम १६, पोट-कलम (२) अन्वये किंवा कलम १७, पोट-कलम (४) अन्वये ठरविलेल्या भरपाईच्या रकमेच्या ; विवादाच्या बाबतीत भरपाईच्या रकमेचे किंवा निव्वळ किंमतीचे संविभाजन.

[1][ (अअ) कलम १८ अन्वये ठरविलेल्या भरपाईच्या रकमेच्या ];

[2][ (ब) कलम २१, पोट-कलम (४) अन्वये ठरविलेल्या अतिरिक्त भरपाईच्या किंवा भरपाईतील कपातीच्या किंवा कलम २१, पोट-कलम (६) किंवा (७) अन्वये वसूल करण्यात आलेल्या किंवा देय असलेल्या निव्वळ किंमतीच्या ; ]

(क) कलम २९, पोट-कलम (२) अन्वये ठरविलेल्या भरपाईच्या एकूण रकमेच्या ;

संविभाजनासंबंधात विवाद उत्पन्न झाल्यास एकत्रीकरण अधिकाऱ्याने असा विवाद जिल्हा न्यायालयाकडे १८९४ त्याच्या निर्णयासाठी पाठविला पाहिजे आणि यथास्थिती, अशी भरपाईची रक्कम किंवा निव्वळ किंमत चा १. न्यायालयाकडे भरणा केली पाहिजे; आणि त्यानंतर भूमी संपादन अधिनियम, १८९४, यांतील कलमे ३३, ५३ व ५४ यांच्या तरतुदी [3]* * [4]* * शक्य तेथवर अशा बाबतीत लागू होतील.

[5][ ३१. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमान्वये नेमून दिलेली कोणतीही धारण जमीन किंवा तिचा कोणताही भाग, या कलमात अन्यथा तरतूद केली असेल तर, त्या व्यतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्वसंमतीशिवाय– एकत्रित धारण जमिनींचे अन्यसंक्रामण किंवा त्यांची पोट-विभागणी करण्यावर निर्बंध.

(अ) हस्तांतरित करता येणार नाही-मग असे हस्तांतरण (दिवाणी न्यायालयाच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरिता किंवा जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्यासाठी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करण्याजोग्या रकमांसाठी केलेली विक्री धरून) विक्रीरूपाने केलेले असो किंवा देणगी, अदलाबदल किंवा पट्ट्याने देणे या रूपाने किंवा अन्यथा केलेले असो ; किंवा

(ब) तिचे तुकडे पडतील अशा रीतीने उक्त धारण जमिनीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची पोटविभागणी करता येणार नाही,–मग ती दिवाणी न्यायालयाच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या हुकूमनाम्यावरून किंवा आदेशावरून किंवा अन्यथा केलेली असो, जिल्हाधिकाऱ्याने अशी पूर्वसंमती विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत व अशा शर्तीच्या अधीनतेने दिली पाहिजे.

---

[1] हा खंड, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२०) अन्वये, दाखल करण्यात आला.

[2] हा खंड, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ११ (अ) अन्वये, दाखल करण्यात आला.

[3] "किंवा उक्त अधिनियमाच्या तरतुदी सौराष्ट्र भागाला भूमि संपादन अधिनियम, १८९४ (अनुकूलन व प्रयुक्ती) अध्यादेश, १९४८ अन्वये लागू करण्यात आल्या" हा मजकूर, महाराष्ट्र विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश १९६० अन्वये वगळण्यात आला.

[4] "किंवा यथास्थिती हैदराबाद भूमि संपादन अधिनियम, १३०९ फसलीचे कलम २८ किंवा कलम ४३" हा मजकूर, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ११ (ब) अन्वये, वगळण्यात आला.

[5] मूळ कलमाऐवजी हे कलम, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २ अन्वये, दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) मधील कोणताही मजकूर–

(अ) (एक) ज्या क्षेत्रासाठी मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ किंवा नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ अन्वये महानगरपालिकेची रचना करण्यात आली असेल ; किंवा

१८८८ चा मुंबई ३ १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधि. २.

१९६५ चा महाराष्ट्र ४०. (दोन) ज्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये नगरपालिकेची रचना करण्यात आली असेल ; किंवा

१९२४ चा २. (तीन) ज्या क्षेत्रासाठी कटक अधिनियम, १९२४ अन्वये कटकाची रचना करण्यात आली असेल अशा क्षेत्रात असलेल्या ; किंवा

१९६६ चा महाराष्ट्र ३७. (ब) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० अन्वये ज्या क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरणाची रचना किंवा नेमणूक करण्यात आली असेल अशा अधिसूचित क्षेत्रात असलेल्या ; किंवा

१९६६ चा महाराष्ट्र ३७. (क) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ११३ अन्वये ज्याच्यासाठी विकास प्राधिकरणाची रचना करण्यात आली असेल त्या नवीन नगराची जागा म्हणून निर्देशित केलेल्या क्षेत्रात असलेल्या ; किंवा

(ड) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जे कोणतेही क्षेत्र कृषीतर किंवा औद्योगिक विकासासाठी राखून ठेवले असल्याचे विनिर्दिष्ट करील त्या क्षेत्रात असलेल्या ; कोणत्याही जमिनीस लागू होणार नाही.

(३) पोट-कलम (१) मधील कोणताही मजकूर,–

(एक) धारण जमिनीच्या कुळाकडे किंवा त्याच्या वारसाकडे ; किंवा

(दोन) लगतच्या धारण जमिनीचा जो मालक स्वतः आपली जमीन कसत असेल त्या मालकाकडे ; किंवा

(तीन) एखाद्या शेतकऱ्याकडे किंवा शेतमजुराकडे संपूर्णपणे ; किंवा

(चार) सार्वजनिक प्रयोजनासाठी ज्या व्यक्तीची जमीन संपादन केल्यामुळे ती भूमिहीन झाली असेल अशा व्यक्तीकडे ; किंवा

(पाच) सहकारी संस्थेकडे ; किंवा

(सहा) मालकाने त्याच्या कुटुंबातील एखाद्या सदस्याच्या नावाने सद्‌भावनेने दिलेली देणगी (मग ती न्यास म्हणून असो किंवा अन्यथा असो) म्हणून, किंवा

(सात) धारक अशी जमीन स्वतः कसत असेल अशा बाबतीत या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या दुसऱ्या ज्या एखाद्या जमिनीचा धारक आपली जमीन अशाच रीतीने स्वतः कसत असेल त्या जमिनीशी करण्यात आलेली अदलाबदल म्हणून ; हस्तांतरित करावयाच्या जमिनीस लागू होणार नाही:

परंतु, असे कोणतेही हस्तांतरण हे जमिनीचा तुकडा पडेल अशा रीतीने करता कामा नये.]

[1][ ३१ अअ. या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी कोणत्याही जमिनीची केलेली हस्तांतरणे किंवा विभाजने किंवा पोटविभागण्या या, जर उपरोक्त तारखेस कोणतीही हस्तांतरणे किंवा विभाजने किंवा पोटविभागण्या किंवा अभिप्रेत असलेली हस्तांतरणे, विभाजने किंवा पोटविभागण्या याद्वारे जमीन ज्याच्या कब्जात असेल त्या व्यक्तीने हस्तांतरित केलेल्या, विभाजन केलेल्या किंवा पोटविभागणी केलेल्या जमिनीच्या मोबदल्याच्या एक टक्क्याइतकी रक्कम किंवा १०० रुपये, यापैकी जी रक्कम कमी असेल त्या रकमेइतका दंड विहित मुदतीमध्ये राज्य शासनास दिला तर, कलम ९ किंवा कलम ३१ याच्या तरतुदींत काहीही असले तरी, या अधिनियमाच्या तरतुदीपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केले आहे याच केवळ कारणावरून, रद्दबातल असल्याचे समजण्यात येणार नाही : दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ पूर्वी करण्यात आलेली विवक्षित हस्तांतरणे, विभाजने व पोटविभागण्या विधीग्राह्य करणे.

परंतु, हस्तांतरित जमीन ज्याच्या प्रत्यक्ष कब्जात असेल त्या कुळाच्या किंवा ज्या जमिनीस लागून असलेली जमीन जिच्या प्रत्यक्ष कब्जात असेल त्या व्यक्तीच्या नावाने जर असे हस्तांतरण करण्यात आले असेल तर त्या संबंधात एक रुपया दंड द्यावा लागेल ].

१९७७ चा महाराष्ट्र ४१. [2][ ३१ अब. (१) मुंबईचा धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, १९७७ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी असल्याप्रमाणेच्या कलम ३१ चे उल्लंघन करून १५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर आणि अशा प्रारंभाच्या तारखेच्या पूर्वी करण्यात आलेले कोणतेही हस्तांतरण किंवा पोटविभागणी ही केवळ असे हस्तांतरण किंवा पोटविभागणी अशा प्रारंभापूर्वी असल्याप्रमाणेच्या त्या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून करण्यात आली असल्याच्या कारणावरून रद्दबातल असल्याचे किंवा नेहमीकरिता रद्दबातल झाली असल्याचे मानण्यात येणार नाही आणि असे हस्तांतरण किंवा पोटविभागणी ही, उक्त अधिनियमाद्वारे बदली दाखल करण्यात आलेल्या कलम ३१ च्या तरतदींनुसार असेल तर असे हस्तांतरण किंवा ती पोटविभागणी विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल. दिनांक १५ नोव्हेंबर १९६५ रोजी किंवा त्यानंतर आणि सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेली विवक्षित हस्तांतरणे किंवा पोट-विभागण्या विधीग्राह्य करणे.

(२) या कलमाच्या प्रयोजनांसाठी जिल्हाधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, कोणत्याही जमिनीचे कोणतेही हस्तांतरण किंवा पोटविभागणी या कलमान्वये विधिग्राह्य असल्याबद्दल दिलेले प्रमाणपत्र हे, त्या बाबतीतील अंतिम व निर्णायक पुरावा असेल. कोणत्याही धारकाला अशा प्रमाणपत्रासाठी जिल्हाधिकाऱ्याडे अर्ज करता येईल.]

[3][ ३१ अ. एखादी योजना अंमलात आल्यानंतर सरदहू योजनेत अभावितपणे झालेली कोणतीही चूक किंवा वगळणूक यामुळे तीत झालेले लेखनदोष किंवा अंकगणितीय चूक यामुळे ती सदोष आहे असे जर जमाबंदी आयुक्ताला वाटले, आणि अशी चूक किंवा दोष सुधारण्यामुळे सरदहू योजनेच्या कोणत्याही महत्वाच्या तपशिलात फरक पडणार नाही, याची त्याला खात्री असेल तर, त्यास लेखी आदेशाद्वारे अशी चूक किंवा दोष सुधारता येईल आणि त्याचा आदेश विहित रीतीने प्रसिध्द करता येईल.] योजनेतील लेखनदोष व अंकगणितीय चुका सुधारणे.

---

[1] कलम ३१ अअ, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १३ अन्वये, समाविष्ट करण्यात आले.

[2] हे कलम, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३ अन्वये, समाविष्ट करण्यात आले.

[3] हे कलम, सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम ५ अन्वये, समाविष्ट करण्यात आले.

चूक, नियमबाह्यता किंवा रीतीबाह्यता घडल्याच्या कारणावरून योजनेत फेरबदल करण्याचा अधिकार.

**३२.** (१) योजना अंमलात आल्यानंतर जर [1][जमाबंदी आयुक्तास] [2][(कलम ३१अ मध्ये उल्लेख केलेल्या चुकीव्यतिरिक्त)] इतर चुक, नियमबाह्यता, रीतिबाह्यता यामुळे योजना सदोष झाली आहे असे दिसून आले, तर [1][जमाबंदी आयुक्ताने] त्याप्रमाणे अशा बदलाचा मसुदा विहित केलेल्या रीतीने प्रसिध्द केला पाहिजे. अशा बदललेल्या मसुद्यात, योजनेत ज्या सुधारणा करण्याचे योजिले असेल ती प्रत्येक सुधारणा नमूद केली पाहिजे.

(२) बदलाचा मसुदा प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, अशा बदलामुळे ज्यास बाधा पोचत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अशा बदलासंबंधाने तिचा जो कोणताही आक्षेप असेल तो [3][जमाबंदी आयुक्तास] लेखी कळविता येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये आक्षेप आल्यावर, [1][जमाबंदी आयुक्तास] त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, [4] * * कोणताही फेरबदल करून किंवा न करता असा बदल करता येईल किंवा योजनेत कोणताही बदल न करण्याचा निर्णय घेता येईल.

[5][(३अ) जर पोट-कलम (३) अन्वये योजनेत बदल करण्यात आला असेल तर योजनेत बदल करण्यात आला आहे असे नमूद करणारी अधिसूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केली जाईल आणि अशा रीतीने बदल करण्यात आलेली योजना संबंधित एका किंवा अनेक गावांत, विहित रीतीने प्रसिध्द केली पाहिजे.]

(४) [6][योजनेत बदल झाले आहेत असे नमूद करणाऱ्या] अधिसूचनेच्या तारखेपासून, असा बदल जणू तो योजनेत समाविष्ट केला होता असे समजून अंमलात येईल.

योजनेत फेरबदल करण्याचा किंवा ती परत घेण्याचा अधिकार.

**३३.** धारण जमिनीच्या एकत्रीकरणाबाबतच्या, या अधिनियमान्वये कायम केलेल्या कोणत्याही योजनेत, या अधिनियमास अनुसरून तयार केलेल्या, प्रसिध्द केलेल्या किंवा कायम केलेल्या नंतरच्या योजनेद्वारे कोणत्याही वेळी बदल करता येईल किंवा ती परत घेता येईल.

कायम झालेली योजना परत घेण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[7][**३३ अ.** (१) राज्य शासनास कोणत्याही वेळी **शासकीय राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारा, या योजनेखाली ज्या व्यक्तीस धारण जमीन दिलेली असेल त्या व्यक्तीने धारण जमिनीचा कब्जा घेतला नसेल तर कायम केलेली योजना परत घेता येईल आणि त्यानंतर अशा योजनेसंबंधी कोणत्याही व्यक्तीस कोणतीही भरपाईची रक्कम दिली अथवा मिळाली असेल तर त्या व्यक्तीने ती रक्कम, विहित करण्यात येईल अशा वाजवी कालावधीत परत केली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये येणे असलेली रक्कम परत करण्यात जर कोणत्याही व्यक्तीने कसूर केली तर ती रक्कम त्यांच्याकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल केली जाईल.]

---

[1] "राज्य सरकार" या शब्दाऐवजी हे शब्द, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १४ (अ) आणि (क) (१) अन्वये, दाखल करण्यात आले.

[2] हे कंस, शब्द, संख्या आणि अक्षरे सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम ६ (१) अन्वये, दाखल करण्यात आले.

[3] "राज्य सरकारला सेटलमेन्ट कमिशनरामार्फत" या मजकुराऐवजी हे शब्द, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १४ (ब) अन्वये, दाखल करण्यात आले.

[4] "राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे" हा मजकूर, सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम (६) (२) अन्वये, वगळण्यात आला."

[5] हे पोट-कलम वरील अधिनियमातील कलम ६ (३) अन्वये, दाखल करण्यात आले.

[6] "फेरफार करणाऱ्या" या शब्दांच्या ऐवजी हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ६ (४) अन्वये दाखल करण्यात आला.

[7] कलम ३३अ, हे सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ४ अन्वये, दाखल करण्यात आले.

## [1][प्रकरण चार अ

### एकत्रीकरण अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्यपद्धती

**३३ब.** कोणतीही योजना तयार करण्याच्या किंवा अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ किंवा अन्यथा या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी एकत्रीकरण अधिकाऱ्यास, किंवा त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही जमिनीच्या मालकास किंवा तिचा भोगवटा करणाऱ्यास किंवा तिच्यात हितसंबंध असलेल्या इतर व्यक्तीस, विहित करण्यात येईल अशी नोटीस दिल्यानंतर, अशा जमिनीवर प्रवेश करता येईल आणि तिचे भूमापन करता येईल किंवा तीवर भूमापनाच्या खुणा उभारता येतील आणि तिच्या हद्दी सीमांकित करता येतील आणि अशा प्रयोजनांसाठी आवश्यक अशी इतर सर्व कामे करता येतील. प्रवेश करण्याचा हक्क

**३३क.** (१) एकत्रीकरण अधिकाऱ्यास, या अधिनियमाखालील कोणतीही योजना तयार करण्याशी किंवा तिच्या अंमलबजावणीशी संबंध असलेल्या कोणत्याही चौकशीच्या प्रयोजनार्थ पक्षकार म्हणून तपासणी होण्यासाठी किंवा साक्षीदार म्हणून पुरावा देण्यासाठी किंवा दस्तऐवज सादर करण्यासाठी ज्या व्यक्तीची उपस्थिती आवश्यक आहे असे त्यास वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस, समन्स काढून बोलावता येईल. पुरावा देण्यासाठी आणि दस्तऐवज सादर करण्यासाठी व्यक्तीस समन्स काढून बोलावण्याचा अधिकार.

(२) अशा रीतीने समन्स काढून बोलाविलेल्या सर्व व्यक्तींवर खालील गोष्टी बंधनकारक राहतील—

(अ) एकत्रीकरण अधिकारी समन्समध्ये निदेश देईल त्याप्रमाणे स्वतः किंवा अधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहणे;

(ब) ज्या विषयाच्या संबंधात त्यांची तपासणी करण्यात येईल किंवा ज्याबाबत त्या निवेदने करतील अशा कोणत्याही विषयांच्या संबंधात सत्यकथन करणे;

(क) एकत्रीकरण अधिकाऱ्यास चौकशीच्या संबंधात आवश्यक वाटतील असे दस्तऐवज आणि इतर गोष्टी सादर करणे.

**३३ड.** (१) प्रत्येक समन्स लेखी असेल आणि त्याच्या दोन प्रती असतील आणि ज्या प्रयोजनार्थ ते काढण्यात आले असेल ते प्रयोजन त्यामध्ये नमूद केले पाहिजे आणि ते काढणाऱ्या एकत्रीकरण अधिकाऱ्याने त्यावर सही केली पाहिजे व जर त्याचा शिक्का असेल तर त्यावर त्याचा शिक्काही उमटविला पाहिजे. समन्सचा नमुना आणि ते बजावण्याची पद्धती.

(२) असे समन्स, ते काढून बोलावण्यात आलेल्या व्यक्तीला त्याची एक प्रत देऊन किंवा तिच्या स्वाधीन करून किंवा ती व्यक्ती सापडत नसेल तर तिच्या नेहमीच्या राहण्याच्या ठिकाणाच्या एखाद्या ठळक भागावर चिकटवून बजावले पाहिजे. जर त्या व्यक्तीचे राहण्याचे ठिकाण दुसऱ्या एखाद्या जिल्ह्यात असेल तर ते समन्स डाकेने त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजे व उक्त जिल्हाधिकाऱ्याने उपरोक्त रीतीने ते बजावण्याची व्यवस्था केली पाहिजे.

**३३ई.** एकत्रीकरण अधिकाऱ्यास, त्याने काढलेल्या समन्समध्ये दिलेल्या निदेशाचे पालन करण्यात जी व्यक्ती पुरेशा कारणाशिवाय कसूर करील, अशा कोणत्याही व्यक्तीवर पंचवीस रुपयांपेक्षा अधिक होणार नाही इतका दंड बसविता येईलः समन्सचे पालन न करण्याबद्दल दंड

परंतु, ज्या गावात अशी व्यक्ती सामान्यतः राहत असेल किंवा जमीन धारण करीत असेल अथवा कसत असेल, त्या गावाच्या हद्दीत हजर राहण्यासाठी अथवा कोणतेही दस्तऐवज सादर करण्यासाठी अशा व्यक्तीस समन्स काढून बोलाविले असल्याखेरीज, या कलमान्वये कोणताही दंड बसविता येणार नाही.

असा दंड, जमीन महसूलाच्या थकबाकीप्रमाणे वसून करण्यायोग्य असेल.]

---

[1] प्रकरण चार अ, हे, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १५ अन्वये, दाखल करण्यात आले.

## प्रकरण पाच

### सर्वसाधारण

जमाबंदी आयुक्तांचे अधिकार निहित करणे

[१][३४. राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, या अधिनियमाखालील जमाबंदी आयुक्ताचे सर्व किंवा कोणतेही अधिकार, जिल्हाधिकाऱ्याकडे त्याच्या अधिकारितेच्या मर्यादेत, किंवा एकत्रीकरण अधिकाऱ्याच्या दर्जाहून वरच्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सर्वसामान्यपणे किंवा विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत निहित करता येतील.]

ग्राम समित्यांची रचना करणे

[२][**३४अ.** (१) एकत्रीकरण अधिकाऱ्याने विहित केलेल्या रीतीने ग्रामसमितीची रचना केली पाहिजे आणि त्या ग्राम समितीने, या अधिनियमान्वये तिच्यावर लादलेली व तिला नेमून दिलेली कर्तव्ये व कामे यांच्या जोडीने या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता विहित करण्यात येतील अशी इतर कर्तव्ये देखील पार पाडली पाहिजेत व अशी कामे केली पाहिजेत.

(२) ग्राम समितीनें, वाजवी कारण किंवा सबब नसताना, या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे तिच्यावर लादलेली कर्तव्य पार पाडण्याचे किंवा कामे करण्याचे नाकारले आहे किंवा तशी कर्तव्ये पार पाडण्यात किंवा कामे करण्यात तिने कसूर केली आहे, किंवा उपरोक्त कर्तव्ये पार पाडणे किंवा कामे करणे समितीस अशक्य होईल अशी परिस्थती निर्माण झाली आहे, किंवा तसे करणे अन्यथा इष्ट किंवा आवश्यक आहे अशी जिल्हाधिकाऱ्याची कोणत्याही वेळी खात्री झाल्यास त्यास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारा, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, पोटकलम (१) च्या तरतुदींनुसार ग्राम समितीची पुनर्रचना करता येईल किंवा या अधिनियमान्वये ग्राम समितीची कामे करण्यासाठी किंवा कर्तव्ये बजावण्यासाठी इतर प्राधिकरणाची नेमणूक करता येईल; आणि त्यानंतर या अधिनियमाखालील ग्राम समितीच्या सर्व उल्लेखांत, अशा पुनर्रचित ग्राम समितीच्या किंवा यथास्थिती, नेमलेल्या प्राधिकरणाच्या उल्लेखांचा समावेश होतो असे समजले जाईल.]

कार्यवाहीचे कागदपत्र मागविण्याचा [३][राज्य] शासनाचा [४][किंवा आयुक्ताचा] अधिकार.

३५. [३][राज्य] शासनास [४][किंवा राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा गोष्टींच्या बाबतीत आयुक्तास] या अधिनियमान्वये कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या कायदेशीरपणाविषयी किंवा औचित्याविषयी [३][राज्य] शासनास [४][किंवा यथास्थिती आयुक्तास] स्वतःची खात्री करून घेण्यासाठी, अशा अधिकाऱ्यापुढे चालू असलेल्या किंवा त्याने निकालात काढलेल्या कोणत्याही प्रकरणाचे कागदपत्र कोणत्याही वेळी मागविता येतील व त्यांची तपासणी करता येईल; व तत्संबंधी [३][राज्य] शासनास [४][किंवा यथास्थिती आयुक्तास] योग्य वाटेल असा आदेश देता येईल :

[५][परंतु, संबंधित पक्षकारांना, आदेशात प्रस्तावित बदल किंवा सुधारणा करण्याविरुद्ध कारण दर्शविण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज कोणत्याही आदेशात बदल किंवा सुधारणा करता येणार नाही.]

अपील व पुनरीक्षण.

३६. या अधिनियमात जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून एरव्ही या अधिनियमाचे प्रकरण दोन, तीन किंवा चार अन्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावर कोणतेही अपील किंवा पुनरीक्षण अर्ज करता येणार नाही.

---

[१] कलम ३४ हे मूळ कलमाऐवजी; सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १६ अन्वये, दाखल करण्यात आले.

[२] कलम ३४अ हे सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२१) अन्वये, दाखल करण्यात आले.

[३] "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, दाखल करण्यात आला.

[४] हे शब्द, जी. एन. आर. डी. क्र. सी. ओ. एन. ३५५८/४३४४५-एम. दि.१४ एप्रिल १९५९ अन्वये, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, अनुसूचीमध्ये दाखल करण्यात आले.

[५] हे परंतुक, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२२) अन्वये, जादा दाखल करण्यात आले.

[1][३६अ. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याद्वारे राज्य शासनाने किंवा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने मिटवणूक करावयाच्या किंवा निर्णय द्यावयाच्या किंवा कार्यवाही करावयाच्या कोणत्याही प्रश्नाबाबत मिटवणूक करण्याचा किंवा त्यावर निर्णय देण्याचा किंवा त्यावर कार्यवाही करण्याची कोणत्याही दिवाणी न्यायालयास किंवा मामलेदाराच्या न्यायालयास अधिकारिता असणार नाही. अधिकारितेस रोध.

(२) राज्य शासनाने किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा प्राधिकाऱ्याने या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशावर कोणत्याही दिवाणी, फौजदारी किंवा मामलेदाराच्या न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

३६ब. (१) कोणत्याही दिवाणी न्यायालयात किंवा मामलेदाराच्या न्यायालयात दाखल केलेल्या कोणत्याही दाव्यात, या अधिनियमान्वये ज्या कोणत्याही वादप्रश्नांबाबत मिटवणूक करण्यास किंवा त्यावर निर्णय देण्यास किंवा त्यावर कार्यवाही करण्यास सक्षम असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने (ज्याचा यात पुढे " सक्षम प्राधिकारी " असा निर्देश केला आहे) त्याची मिटवणूक करणे, निर्णय देणे किंवा कार्यवाही करणे आवश्यक असेल असे वादप्रश्न अंतर्भूत असतील तर, अशा दिवाणी न्यायालयाने किंवा मामलेदाराच्या न्यायालयाने उक्त दावा स्थगित केला पाहिजे आणि असे वादप्रश्न निर्णयासाठी अशा सक्षम प्राधिकाऱ्याकडे पाठविले पाहिजेत. या अधिनियमान्वये निर्णय द्यावयाच्या वादप्रश्नांचा अंतर्भाव असलेले दावे.

(२) निर्णयासाठी दिवाणी न्यायालयाने किंवा मामलेदार न्यायालयाने अशा रीतीने पाठविलेले वादप्रश्न मिळाल्यावर सक्षम प्राधिकाऱ्याने या अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्यावर कार्यवाही केली पाहिजे व त्यावर निर्णय दिला पाहिजे आणि आपला निर्णय उक्त दिवाणी न्यायालयास किंवा मामलेदाराच्या न्यायालयास कळविला पाहिजे आणि त्यानंतर अशा न्यायालयाने उक्त दावा, त्यास लागू असलेल्या कार्यपद्धतीस अनुसरून निकालात काढली पाहिजे.

३६क. या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या, कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाही.] हानिरक्षण.

(२) विशेषेकरून व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता

३७. (१) [2] [राज्य] शासनास **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारा, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. नियम.

(२) विशेषकरून व पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता [2] [राज्य] शासनास पुढील गोष्टींविषयी तरतूद करण्यासाठी नियम करता येतील—

(अ) कलम ४, पोट-कलम (२) अन्वये प्रसिद्ध करण्याची रीत;

(ब) कलम ५, पोट-कलम (३) अन्वये जाहीर नोटीस देण्याची रीत;

(क) कलम ६, पोट-कलम (१) अन्वये ज्यांत जमिनीच्या तुकड्याची नोंद केली जाईल ते ग्राम अभिलेख;

[3] [(कक) कलम ८ अअ पोट-कलम (२) चा खंड (ब) अन्वये चिठ्ठ्या टाकून निवड करण्याची रीत;]

(ड) कलम १५ अन्वये योजना तयार करण्याचा उद्देश ज्या रीतीने प्रसिद्ध केला जाईल ती रीत ;

---

[1] कलमे ३६अ, ३६ब आणि ३६क ही, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२३) अन्वये, समाविष्ट करण्यात आली.

[2] " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द, विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, दाखल करण्यात आला.

[3] खंड (कक) हा, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२४) अन्वये, दाखल करण्यात आला.

[4] " आणि योजना तयार करण्याची रीत " हे शब्द वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये वगळण्यात आले.

[१] [(डड) एकत्रीकरण करण्यासंबंधीच्या योजनेत समाविष्ट करावयाची विवरणपत्रे, अभिलेख व नकाशे आणि कलम १५ अ अन्वये योजना तयार करताना ज्या गोष्टींचे पालन करणे आवश्यक असेल त्या गोष्टी व तद्‌विषयक कार्यपद्धती;]

(ई) कलम १७, पोट-कलम (१) अन्वये केलेला घोषणा, उक्त कलमाचे पोट-कलम (२) अन्वये प्रसिद्ध करण्याची रीत;

[२] [(फ) संबंधित एका किंवा अनेक गावांत, कलम १९ अन्वये एकत्रीकरणाच्या योजनेचा मसुदा किंवा योजनेचा सुधारलेला मसुदा ज्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल ती रीत;]

[३] [(फफ) कलम २०, पोट-कलम (२) [४] * * अन्वये आणखी सुधारलेली योजना प्रसिद्ध करण्याची रीत;]

(ग) योजना कायम करण्यात आल्यानंतर ती कलम २१, पोट-कलम (१)अन्वये प्रसिद्ध करण्याची रीत;

[५] [(ह) कोणत्याही मालकाकडून वसूल करावयाची भरपाईची रक्कम ही कलम २१, पोट-कलम (२) किंवा (४) अन्वये ज्या रीतीने तो भरणा करील ती रीत;]

(आय) कलम २१, पोट-कलम (३) अन्वये ज्या धारण जमिनीवर मालकांचा हक्क असेल ती धारण जमीन ज्या रीतीने त्यांच्या कब्जात दिली जाईल ती रीत; आणि उक्त पोटकलमान्वये ज्या रीतीने व्यक्तीस काढून टाकता येईल ती रीत;

(आय आय) कलम २१, पोट-कलम (४) अन्वये एखाद्या मालकाने, त्यास योजनेअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही धारण जमिनीबाबत द्यावयाची जादा भरपाईची रक्कम किंवा अशा जमिनीच्या मूळ मालकास द्यावयाच्या भरपाईत केलेली कपात ठरविण्याची रीत;]

(ज) कलम २१, [६][पोट-कलम (६)] अन्वये धारण जमिनीसंबंधीचा हक्क ज्या रीतीने देता येईल ती रीत;

(के) कलम २४ अन्वये ज्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र दिले जाईल तो नमुना;

(ल) कलम २६, पोट-कलम (२) खंड (ब) अन्वये ज्या मुदतीत अर्ज केला जाईल ती मुदत;

[७] [(लल) कलम २७, खंड (ब) अन्वये ज्या परिस्थितीत व ज्या शर्तीच्या अधीनतेने जमिनीचे हस्तांतरण करण्यास परवानगी देता येईल ती परिस्थती व त्या शर्ती;]

(म) कलम २९, पोट-कलम (१) अन्वये [८] * * गहाण, ऋण किंवा इतर भार यांच्या हस्तांतरणबाबत एकत्रीकरण अधिकारी व इतर अधिकारी व व्यक्ती यांचे मार्गदर्शन;

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२४) अन्वये, खंड (डड) दाखल करण्यात आला.

[२] खंड (फ) हा मूळ खंडाऐवजी; सन १९६६ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १७ (अ) (एक) अन्वये, दाखल करण्यात आला.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम ७ (१) अन्वये, हा खंड दाखल करण्यात आला.

[४] " चा खंड (ब)" हे शब्द, कंस आणि अक्षरे, सन १९६६ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १७, (अ) (दोन) अन्वये, वगळण्यत आली.

[५] खंड (ह), (आय) आणि (आयआय) हे मूळ खंड (ह) आणि (आय) ऐवजी वरील अधिनियमाच्या कलम १७ (अ) (तीन) अन्वये दाखल करण्यात आले.

[६] " पोट-कलम (४)" हे शब्द, कंस आणि संख्या याऐवजी हा मजकूर वरील अधिनियमातील कलम १७ (अ) (चार) अन्वये, दाखल करण्यात आला.

[७] खंड (लल), हा, सन १९६४ चा महराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम (५) (अ) अन्वये, दाखल करण्यात आला.

[८] "पट्टा" हा शब्द, सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम १३ (२) अन्वये, वगळण्यत आला.

[१][(न) कलम ३१, पोटकलम (१) अन्वये ज्या परिस्थितीमध्ये व ज्या शर्तीच्या अधीनतेने धारण जमिनीचे हस्तांतरण किंवा पोटविभागणी करता येईल ती परिस्थिती व त्या शर्ती ;]

[२][(नन) कलम ३१ अ अन्वये आदेश प्रसिध्द करण्याची रीत ;]

(ओ) कलम ३२, पोटकलम (१) अन्वये बदलाचा मसुदा [३][किंवा त्या कलमाचे पोटकलम (३ अ) अन्वये बदल केलेल्या योजनेचा] मसुदा प्रसिध्द करण्याची रीत ;

[४][(ओ १) कलम ३३ अ च्या पोटकलम (१) अन्वये भरपाईची रक्कम ज्या कालावधीत परत केली पाहिजे तो कालावधी ; ]

[५][(ओ २) कलम ३३ व अन्वये द्यावयाची नोटीस ;]

[६][(ओओ) कलम ३४ अ अन्वये, ज्या रीतीने ग्राम समित्यांची रचना करण्यात येईल ती रीत आणि त्यांनी पार पाडावयाची कर्तव्ये व कामे ;]

(प) पुनर्रचना केलेल्या प्रत्येक धारण जमिनीचे किंवा तिच्या भागाचे क्षेत्र व आकारणी (कोणतीही पाणीपट्टी असल्यास ती धरुन) ज्या रीतीने ठरविण्यात येईल ती रीत ;

(क्यू) एकत्रीकरणाच्या योजनेनुसार अधिकार अभिलेखात ज्या रीतीने दुरूस्त्या करण्यात येतील ती रीत ;

(र) सामान्यतः, या अधिनियमान्वये चालवावयाच्या सर्व कामात एकत्रीकरण अधिकारी व इतर अधिकारी व व्यक्ती यांच्या मार्गदर्शनासाठी ;

(स) विहित केलेली किंवा विहित करता येईल अशी कोणतीही इतर गोष्ट.

(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिध्दीच्या अटीस अधीन असतील.

[७][(४) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम हा, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधान मंडळाचे अधिवेशन चालू असतांना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण ३० दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे मान्यता देतील किंवा नियम करण्यात येऊ नये म्हणून मान्यता देतील तर, अशा निर्णयासंबंधीची अधिसूचना **शासकीय राजपत्रात** ज्या तारखेला प्रसिध्द करण्यात येईल त्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच तो अंमलात येईल किंवा अंमलात येणार नाही. तथापि, असा कोणताही फेरबदल केल्यामुळे किंवा नियम निरसित केल्यामुळे, या नियमान्वये ज्या गोष्टी पूर्वी करण्यात आल्या किंवा करावयाच्या राहून गेल्या अशा कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.]

---

[१] हा खंड, सन १९७७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ४ अन्वये मूळ खंडाऐवजी दाखल करण्यात आला.

[२] हा खंड, सन १९५६ मुंबई अधिनियम क्रमांक ३३, कलम ७ (२) अन्वये दाखल करण्यात आला.

[३] हा मजकूर वरील अधिनियमाच्या कलम ७ (३) अन्वये, दाखल करण्यात आला.

[४] खंड (ओ १) हा, सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ५ (ब) अन्वये, दाखल करण्यात आला.

[५] खंड (ओ २) हा, सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १७ (अ) (५) अन्वये, दाखल करण्यात आला.

[६] खंड (ओओ) हा, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२४) अन्वये, दाखल करण्यात आला.

[७] पोटकलम (४) हे, मूळ कलमाऐवजी सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम १७ (ब) अन्वये, दाखल करण्यात आले.

निरसन व व्यावृत्ती. [1][३८. मुंबईचा धारणा जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५८, याद्वारे हा अधिनियम [2][मुंबई राज्याच्या] ज्या भागास लागू करण्यात आला आहे त्या भागात तो अंमलात आल्यानंतर पुढील तरतुदी निरसित करण्यात येतील :– १९५८ चा मुंबई ६१.

(एक) हैदराबादचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत अधिनियम, १९५६ ; १९५६ चा हैदराबाद ४०.

(दोन) सौराष्ट्राचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे नियमन करण्याबाबत अधिनियम, १९५४, याचे प्रकरण २; १९५४ चा सौराष्ट्र १२.

(तीन) मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४* यातील प्रकरण १६ : १९५५ चा मध्यप्रदेश २.

परंतु, वरील तरतुदी अशा रीतीने निरसित केल्यामुळे :

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याचा तो निरसित होण्यापूर्वीचा अंमल किंवा त्या कायद्यान्वये योग्य रीतीने केलेली किंवा करू दिलेली कोणतीही गोष्ट ; अथवा

(ब) अशा रीतीने निरसित केलेला कोणत्याही कायद्यान्वये संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला किंवा पत्करलेला कोणताही हक्क, विशेष अधिकार, आबंधन किंवा दायित्व ; अथवा

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या कोणत्याही कायद्याविरूध्द केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे त्याखाली झालेली कोणतीही शास्ती ;

यांस बाधा येणार नाही ; आणि मुंबईचा धारणा जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रीकरण करण्याबाबत (व्याप्ती वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९५८, हा पारित झाला नव्हता असे समजून, असा कोणताही हक्क, विशेष अधिकार, आबंधन, दायित्व किंवा शास्ती यांच्या संबंधात कोणतेही अन्वेषण, कार्यवाही किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती लादता येईल ;

परंतु आणखी असे की, पूर्ववर्ती परंतुकाच्या अधीनतेने, निरसित केलेल्या अशा कोणत्याही कायद्यान्वये केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कोणतीही उपाययोजना ही (यात, केलेली कोणतीही नेमणूक किंवा प्रत्यायोजन, काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश किंवा नोटीस, केलेले नियम, विनियम किंवा नमुना, तयार केलेली किंवा कायम केलेली योजना, ठरविलेली, निश्चित केलेली किंवा सुधारलेली प्रमाण क्षेत्रे, तुकड्याचे हस्तांतरण किंवा तो पट्ट्याने देणे, त्याची किंमत ठरविणे, अविभक्त संपदेचे विभाजन किंवा अधिकार अभिलेखात केलेली नोंद, ठरविलेली भरपाईची रक्कम, दिलेले प्रमाणपत्र, योग्य रीतीने हस्तांतरित, अन्यसंक्रामित १९५८ चा मुंबई ६१.

---

[1] कलम ३८ हे, सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६१, कलम ३ (२५) अन्वये, दाखल करण्यात आले.

[2] "राज्य" या शब्दाऐवजी हे शब्द, महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य आणि समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये, दाखल करण्यात आले.

* महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये हा अधिनियम निरसित करण्यात आला. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याचे कलम ३३६ पहा.

किंवा पोटविभागणी केलेल्या एकत्रित धारण जमिनी यांचा समावेश होतो) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली कृती किंवा केलेली उपाययोजना आहे असे समजले जाईल आणि त्या कृतीचे किंवा त्या उपाययोजनेचे या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही कृतीमुळे किंवा उपाययोजनेमुळे अधिक्रमण केल्याखेरीज व अधिक्रमण करण्यात येईतोपर्यंत ती कृती किंवा उपाययोजना त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.]

---

शा. मु. औ.–(एच) २६७–६,०५०–९१–२००६

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद.